## टीम इंडियाचे विक्रमी जगज्जेतेपद; तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला



**अहमदाबाद :** संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, ईशान किशन यांची तडाखेबंद अर्धशतके आणि गोलंदाजांच्या संतुलित कामगिरीच्या जोरावर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत न्यूझीलंडवर एकतर्फी विजय साकारला आणि सलग दुसऱ्यांदा आणि एकूण तिसऱ्यांदा वर्ल्डकप उंचावला. भारताने नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत पाच बाद २५५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात किवी संघ १९ षटकांत १५९ धावांमध्येच गारद झाला. प्रारंभी संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा या जोडीने टीम इंडियाला धमाकेदार सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ४३ चेंडूत ९८ धावांची भागीदारी रचली. अभिषेक २१ चेंडूत सहा चौकार व तीन षटकारांसह ५२ धावांची खेळी करून परतल्यावर ईशान किशनचा धमाका पाहायला मिळाला. संजूने ४६ चेंडूत पाच चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने ८९ धावांची खेळी साकारली, तर ईशानने २५ चेंडूत ५४ धावांचे योगदान दिले. त्याच्या बॅटमधून प्रत्येकी चार चौकार आणि षटकार पहायला मिळाले.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २३०
www.ramprahar.com

◆ सोमवार, ९ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


# सरकारचे धोरण महिलाकेंद्रित

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व परिषदेत प्रतिपादन



**भाईंदर : प्रतिनिधी**

देशाच्या विकासासाठी महिलाकेंद्रित धोरणांची अंमलबजावणी सरकार करीत आहे. महिलांचा सहभाग वाढल्याशिवाय अर्थव्यवस्थेला गती मिळू शकत नाही. खऱ्या अर्थाने महिला या अर्थसंकल्पाचे दुसरे आणि महत्त्वाचे चाक आहेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. ८) भाईंदर येथे महिलांच्या नेतृत्व परिषदेत केले.

ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी विकसित भारत नारीशक्ती संगम या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ८ व ९ मार्च रोजी भाईंदर येथील रामाभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या प्रांगणात ही परिषद होत आहे.

या परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, पद्मश्री पोपटराव पवार, मिरा भाईंदर महापालिकेच्या महापौर डिंपल मेहता तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांची उपस्थिती लाभली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

जगातील विकसित देशांचा अभ्यास केला असता महिलांना मानवी संसाधन व्यवस्थेत महत्त्वाची जबाबदारी दिल्यामुळे सकारात्मक बदल घडून आलेले दिसतात. याच धर्तीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशात महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी विविध धोरणे राबविण्यास सुरुवात केली आहे. महिलांना अधिकाधिक व्यावसायिक क्षेत्रात संधी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

देशात काही काळ मुलगा-मुलगी भेदाची प्रवृत्ती वाढत होती, मात्र बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेमुळे समाजात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. आज महिला विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. लखपती दिदीसारख्या उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

महिलांना राजकीय क्षेत्रात अधिक संधी मिळाव्यात यासाठी लोकसभा निवडणुकांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय देशाच्या लोकशाही व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणारा ठरेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही आरक्षणामुळे महिलांचे अस्तित्व ठळकपणे दिसू लागले असून अनेक ठिकाणी महिलांचे नेतृत्व पुढे येत आहे. २०२९नंतर भारताची वाटचाल महिला केंद्रित लोकशाहीकडे होईल, असा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

### लाडकी बहीण योजनेतून महिलांना मिळणार कर्ज

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक बळकट करण्यासाठी लाडकी बहीण योजनेला शासनाच्या इतर योजनांशी जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून महिलांना विविध व्यवसाय व उपक्रमांसाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. महत्त्वाची बाब म्हणजे लाडकी बहीण योजनेंतर्गत शासनाकडून मिळणारी आर्थिक मदतच या कर्जाच्या परतफेडीसाठी उपयोगात आणली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. यामुळे महिलांना विविध क्षेत्रांत व्यवसाय सुरू करण्यास चालना मिळेल. शासनाच्या उमेद या उपक्रमामार्फत या प्रक्रियेची अंमलबजावणी केली जाणार असून जिल्हानिहाय उभारण्यात येणाऱ्या उमेद मॉलमध्ये महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यामुळे महिला उद्योग-व्यवसायात मोठ्या खासगी संस्थांनाही स्पर्धा देतील, असेही मुख्यमंत्री म्हणाले.



# महिला दिनी डोंबिवलीत सामूहिक लेझिमचा विश्वविक्रम

## ९१११ विद्यार्थिनींनी रचला इतिहास

**डोंबिवली : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डोंबिवली येथे रविवारी (दि. ८) नऊ हजार १११ महिलांसह विद्यार्थिनींनी एकत्र येऊन लेझीमचा गजर केला. याद्वारे विश्वविक्रम करत नारीशक्तीने शिरपेचात एक मानाचा तुरा खोवला आहे.

डोंबिवलीचे आमदार तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर... एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक लेझीम वादन उपक्रम आयोजित करण्यात आला होता. हभप सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील विस्तीर्ण पटांगणावर शेकडो शाळांच्या विद्यार्थीनी आणि महिलांनी एकत्र येत ९१११ इतक्या मोठ्या संख्येने सामूहिकपणे लेझीम वादनाचा जागतिक विक्रम आपल्या केला.

यावेळी परिसर भारत माता की जय, जय श्रीराम, वंदे मातरम् घोषणांनी दणाणून गेला होता.



**वर्ल्डरेकॉर्ड भारत मातेच्या चरणी अर्पण -प्रदेशाध्यक्ष चव्हाण**

*लेझीम ही आपली संस्कृती असून ती टिकवणे हे आपले काम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या वर्षी शारीरिक व्यायामावर भर देऊन जगासमोर सशक्त भारत कसा असू शकतो हे दाखवून देण्याचा संकल्प सोडला होता. त्या निमित्ताने महिला, विद्यार्थीनी आदींनी एकत्र येऊन हा अनोखा रेकॉर्ड केला याचा मला डोंबिवलीकर म्हणून प्रचंड आनंद आहे. हा रेकॉर्ड मी भारत मातेच्या चरणी समर्पित करतो, असे उद्गार काढत आयोजक भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.*

## निवडक

### इस्रायलचा लेबनॉनवर हल्ला; ४१ जणांचा मृत्यू

**बैरुत :** इस्रायलने लेबनॉनवर मोठा हल्ला केला असून या हल्ल्यात ४१ जणांचा मृत्यू झाला आहे. लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, नबी शीट आणि आसपासच्या भागात झालेल्या हल्ल्यांमध्ये ४१ जणांचा मृत्यू झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. या हल्ल्यात अनेक इमारती कोसळल्या आणि घरे उद्ध्वस्त झाली. एका पडलेल्या घरात हिजबुल्लाहच्या नेत्यांचे फाटलेले पोस्टरही आढळले.

### एमपीएससी राज्यसेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलली

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीकडून राज्य सेवा मुख्य परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार २९ मार्च ते २६ एप्रिलदरम्यान घेण्यात येणार होती, परंतु काही उमेदवारांनी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी संबंधित परीक्षा पुढे ढकण्याबाबत आयोगाकडे विनंती केल्याने त्याचा विचार करून आयोगाने परीक्षेचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार संबंधित परीक्षा आता ५ एप्रिल ते २ मेदरम्यान होणार आहे. पूर्वपरीक्षेत पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी १४ मार्चपर्यंत परीक्षा अर्ज भरता येणार आहे.

# ...हा केवळ राष्ट्रपतींचा नाही, तर संविधानाचाही अपमान

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ममता बॅनर्जींवर हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यक्रमात प्रोटोकॉलचे उल्लंघन झाल्याच्या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस (टीएमसी) सरकारवर जोरदार टीका केली. ही घटना केवळ राष्ट्रपतींचा अपमान नसून भारताच्या संविधान आणि लोकशाहीच्या भावनेवर आघात असल्याचे त्यांनी म्हटले.



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रविवारी (दि.८) दिल्लीमध्ये आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदींच्या हस्ते सुमारे ३३,५०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन झाले. त्यावेळी आयोजित जनसभेला संबोधित करताना त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर निशाणा साधला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देश आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करत आहे, पण काल पश्चिम बंगालमध्ये टीएमसी सरकारने देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा घोर अपमान केला. त्या संथाल समाजाच्या मोठ्या उत्सवात सहभागी होण्यासाठी बंगालमध्ये गेल्या होत्या, मात्र त्यांचा सन्मान करण्याऐवजी टीएमसीने या पवित्र कार्यक्रमाचा बहिष्कार केला.

द्रौपदी मुर्मू स्वतः आदिवासी समाजातून आलेल्या आहेत आणि त्या नेहमीच आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रयत्नशील असतात. तरीही राज्य सरकारने या कार्यक्रमाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केले नाही. हा केवळ राष्ट्रपतींचा अपमान नाही, तर भारताच्या संविधानाचा आणि लोकशाहीच्या महान परंपरेचाही अपमान आहे, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले.

यावेळी पंतप्रधान मोदी यांनी टीएमसी सरकारवर टीका करताना म्हटले की, सत्तेचा अहंकार कोणाचाही टिकत नाही. टीएमसीचे गलिच्छ राजकारण आणि सत्तेचा अहंकार, ज्यामुळे एका आदिवासी महिला राष्ट्रपतींचा अपमान झाला, तो बंगालची जनता लवकरच चकनाचूर करेल. पश्चिम बंगालमधील जागरूक जनता, देशातील महिला आणि आदिवासी समाज टीएमसीला कधीही माफ करणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# पनवेलमध्ये भाजप महिला मोर्चातर्फे नारीशक्ती उत्सव



महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा पनवेल शहर मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नारीशक्ती उत्सवाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील गुजराती शाळेच्या मैदानावर करण्यात आले होते. महिला सक्षमीकरणाला चालना देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

नारीशक्ती उत्सवात शनिवारी आणि रविवारी असे दोन दिवस संध्याकाळी विविध उपक्रम झाले. यामध्ये पाककला स्पर्धा, आरी वर्क वर्कशॉप, मेहंदी वर्कशॉप, पॉटरी वर्कशॉप अशा विविध स्पर्धा व कार्यशाळांचा समावेश होता. या माध्यमातून महिलांच्या कलागुणांना व उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न भाजप महिला मोर्चाकडून करण्यात आला. **(पान २ वर..)**

**जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित नारीशक्ती उत्सव हा महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. स्त्री सक्षमीकरण केवळ बोलून नव्हे, तर प्रत्यक्ष पाठबळ देऊनच शक्य आहे. महिलांना समाजात मान-सन्मानाने उभे राहण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असून पनवेल भाजपच्या वतीने आयोजित या कार्यक्रमामुळे महिला बचत गट आणि महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्रीसाठी उत्तम व्यासपीठ मिळाले आहे.**

**-नितीन पाटील,** महापौर, पनवेल

# साताऱ्यातील बावधनमध्ये बगाड यात्रेचा थरार

**वाई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्वात मोठी बगाड यात्रा म्हणून सातारा जिल्ह्याच्या वाईमधील बावधन प्रसिद्ध आहे. काशीनाथाचं चांगभलं म्हणत बावधनची बगाड यात्रा रविवारी (दि. ८) असंख्य भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली.

तब्बल ३०० वर्षांचा इतिहास असलेली ही यात्रा म्हणजे गावकऱ्यांची एकी, भक्ती अन् समृद्ध संस्कृतीचा संगम आहे. भैरवनाथाचा विवाह सोहळा, छबिना, मिरवणूक आणि पारंपरिक बगाड हे या यात्रेचे प्रमुख आकर्षण असते. गुलालाच्या उधळणीत भैरवनाथाच्या नावाने चांगभलंचा गजर करत भाविकांनी बगाडाचे दर्शन घेत भक्तिभावाने नवस फेडले.



(छाया : सुधीर नाझरे)

होळी पौर्णिमेच्या दिवशी मध्यरात्रीनंतर बावधनच्या श्री काळभैरवनाथ मंदिरातील पुजारी पारंपरिक पद्धतीने देवाला कौल लावून बगाड ठरवतात. ज्यांनी ज्यांनी नाथांना नवस केलेला असतो, ते सर्व भाविक देवासमोर ओळीने कौलासाठी बसतात. उजवा कौल म्हणजे बगाडाचा मानकरी. देवाचा कौल मिळताच काशीनाथाचे चांगभलं या जयघोषाने आसमंत दुमदुमतो. यंदा नवस फेडण्यासाठी एकूण ६१ नवसकरी बसले होते. त्यापैकी ३७व्या क्रमांकावर असलेल्या विठ्ठल सोपान कदम यांच्या बाजूने देवाचा कौल लागल्याने त्यांना बगाड होण्याचा मान मिळाला.

या यात्रेत एका भाविकाने चक्क अमेरिकन डॉलर्सची माळ बगाडाला अर्पण केली. ही माळ भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. यामुळे यात्रेला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाल्याचे पहायला मिळाले.



**पनवेल : सकल गुरव समाज विविध प्रलंबित मागण्यांसाठी अखिल गुरव समाज संघटनेच्या माध्यमातून १७ मार्च रोजी मुंबई येथील आझाद मैदानात एकवटणार आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेचे सरचिटणीस विजय ठोसर यांनी रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन निवेदन देत सहकार्य करण्याची विनंती केली. ठोसर यांच्यासमवेत सहकारी उपस्थित होते. गुरव समाजाच्या न्याय्य मागण्यांसंदर्भात शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी दिले.**

# पेण कासू येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर





## आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाची सुरुवात पेण तालुक्यातील कासू मंडळाअंतर्गत कासू गावातील हनुमान मंदिर प्रांगणात काल शनिवारी करण्यात आली आहे. या शिबिराचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील, प्रांत अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, जिळ परिषद सदस्या पल्लवी भोईर, पं.स. सदस्य संजय भोईर, पं.स. सदस्या प्रिती पाटील या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.


या शिबिरासाठी पेण प्रांत कार्यालय व पेण तहसीलदार कार्यालयाचे नायब तहसीलदार प्रसाद कालेकर,नायब तहसीलदार नितीन परदेशी, नायब तहसीलदार रश्मी सांळुखे, साकव संस्थेचे अरुण शिवकर, कृषी अधिकारी सागर वाडकर, कृषी सहाय्यक तलाठी शंकर तवर, संजय शिंगे, वासुदेव म्हात्रे, कोतवाल कासू ग्रामपंचायत अधिकारी मच्छिंद्र पाटील ग्रामपंचायत कर्मचारी पोलिस पाटील, कोतवाल, आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर शिक्षक, अंगणवाडी सेविका असे शासकीय अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

आमदार रविशेठ पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे कल्याणकारी हिंदवी स्वराज्य स्थापन केले रयतेच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी महाराजांचा विशेष भर असे याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा शुभारंभ करताना नागरिकांना शासकीय दाखले, महसूली तक्रारी, प्रलंबित दावे या शिवाय वैयक्तिक लाभाच्या केंद्र व राज्य सरकारच्या योजना बाबत सर्व सुविधा या शिबिरातून मिळून नागरिकांचे समाधान व्हावे जनतेच्या समस्या तातडीने सुटाव्यात आवाहन आमदार रवीशेठ पाटील यांनी शेवटी केले.

एक खिडकी योजना' पद्धतीने सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहणार असल्याने नागरिकांच्या विविध महसुली कामांचे तातडीने निराकरण होणार असून या अभियानामुळे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान होईल, असा विश्वास निर्माण होऊन नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तातडीने निवारण करणे, प्रलंबित प्रकरणांना गती देणे तसेच प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे, प्रवीण पवार यांनी याप्रसंगी सांगीतले.

# मुरूड-साळाव रस्त्याच्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा -ॲड.मोहिते

**मुरुड : प्रतिनिधी**



मुरुड-साळाव हा ३२ किलोमीटरचा रस्ता काँक्रीटीकरण होत आहे. या रस्त्याचे काम करणारा ठेकेदार हा निष्क्रीय व संवेदना हीन आहे. जागोजागी मोऱ्या बांधण्यासाठी रस्ता खोदून ठेवला परंतु या खड्या भोवती बेरिकेट टाकून प्रवासी वर्गाची काळजी घेणे खूप गरजेचे होते. नुकताच या खड्ड्यांमध्ये पडून वनरक्षक सूरज सारंगे याचा मृत्यू झाला आहे.

याला जबाबदार या रस्त्याचा ठेकेदार असून या ठेकेदारावर मुरुड पोलिस ठाण्यामध्ये सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी जोरदार मागणी भारतीय जनता पार्टी चे दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख ॲड महेश मोहिते यांनी केली आहे.

मुरुड येथे सदरची घटना घडल्यावर प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी केल्यावर ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत भाजपचे सक्रीय कार्यकर्ते महेश मानकर व अन्य मान्यवर सुद्धा उपस्थित होते. यावेळी ॲड.महेश मोहिते यांनी सांगितले की, मुरुड साळाव रस्ता ज्या ठेकेदाराने घेतला आहे तोच रस्ता साळाव ते तळेखार रस्ता सुद्धा यानेच बनवला होता.

त्यावेळी सुद्धा त्याने रस्त्याची देखभाल न घेतल्याने या रस्त्यावर सुद्धा छोटे मोठे अपघात झाले होते. मोऱ्या बनवण्यासाठी अर्धा रस्ता खोल खण्यात येतो. रहदारीला केवळ अर्धा रस्ता प्राप्त होतो. त्यामुळे वाहतूक जाम होते. खणण्यात आलेल्या रस्त्यांवर लोखंडी बेरिकेट लावल्यास अपघात होणारच नाही. फक्त प्लास्टिक दिशादर्शक बसवून काय फायदा . आज जो अपघात झाला तो कमवता युवक आपल्यातून निघून गेला आहे. त्याला दोन लहान बाळ आहेत संबंधित ठेकेदाराने त्याच्या घरच्या लोकांना योग्य ती आर्थिक मदत करणे खूप आवश्यक आहे.

संबंधित ठेकेदाराने तातडीने रस्ता पूर्ण होईल याकडे लक्ष देताना प्रवासी वर्गाला कोणताही त्रास होणार नाही याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

वनरक्षक सूरज सारंगे याच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर तातडीने सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा भाजप तर्फे जनादोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी एड. महेश मोहिते यांनी दिला आहे.

# नागोठण्यात मुस्लिम बांधवांकडून शिवपालखी मिरवणुकीचे स्वागत



**नागोठणे : बातमीदार**

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत पुण्यश्लोक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागोठणे येथे शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ रोजी शिवसेना शाखेच्या वतीने शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने काढण्यात आलेल्या भव्य शिव पालखी मिरवणुकीचे नागोठण्यातील मुस्लिम बांधवांकडून जंगी स्वागत करण्यात आले. यामुळे परिसरात सामाजिक ऐक्य व बंधुभावाचे सुंदर दर्शन घडले.

यंदाच्या शिवजयंती उत्सवाचे अध्यक्षपद मुस्लिम समाजातील दानशूर व्यक्तिमत्व इम्रान पानसरे यांनी भूषविल्यामुळे शिव पालखी मिरवणूक मुस्लिम मोहल्ल्यात नेण्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

शिवसेना शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.शिव पालखी मिरवणूक मुस्लिम मोहल्ल्यातील खुमाचा नाका येथे पोहोचताच मुस्लिम बांधवांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

यावेळी मिरवणुकीत सहभागी झालेल्या शिवप्रेमींना सरबत पाजून त्यांचे आदरातिथ्य करण्यात आले. या स्वागतामुळे परिसरात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळाले.

यावेळी नागोठणे जिल्हा परिषद सदस्य सुमितदादा काते, शिवजयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष इम्रान पानसरे, नागोठणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच अखलाक पानसरे, अशपाक पानसरे, प्रियदर्शनी संस्थेचे संचालक सिराजभाई पानसरे, जिल्हा काँग्रेस सरचिटणीस तथा प्रियदर्शनी संस्थेचे उपाध्यक्ष सद्दाम दफेदार, काँग्रेस शहर अध्यक्ष आसिफ मुल्ला, सामाजिक कार्यकर्ते सुहेल पानसरे, युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीस तसव्वूर (पप्पूशेठ) अधिकारी, हुसेन पठाण, सलाम पानसरे, फैय्याज पानसरे, याकुब सय्यद यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावमध्ये आगीचे तांडव; अर्ध्या तासाने आली अग्निशामक दलाची गाडी

**माणगाव : बातमीदार**

माणगावातील जुन्या पाटबंधारे विभाग कार्यालयाच्या मागे रंगपंचमीच्या दिवशी भर दुपारी आग लागली. मात्र नगरपंचायती पासून १० मिनीटाच्या अंतरावर आग लागली असतांना ही अर्ध्या तासाने अग्निशामक दलाची गाडी आली. त्यामुळे अग्निशामक दलाला आग विझवण्यात खूप उशिराने यश आले.



पाटबंधारे विभागाच्या जुन्या कार्यालयाच्या मागे म्हणजेच अगदी तहसील कार्यालयाच्या समोरील साई मंदिराच्या शेजारी रंगपंचमीच्या दिवशी भर दुपारी आगीचे तांडव सुरू झाले. प्रत्यक्षदर्शींच्या मते सदरील आग लागल्यापासून अर्धा तासापेक्षा जास्त वेळ जाऊनहीं आग विझवण्यासाठी प्रशासनाकडून तसेच अग्निशामक दलाकडून कोणत्याही प्रकारची मदत किंवा गाडी येऊ शकली नाही. शेजारील घरातून एक महिला चक्क पाण्याचा पाईप घेऊन तेथे हजर झाल्या. परंतु तरीदेखील अग्निशामक दलाची गाडी आली नव्हती. त्यानंतर अर्ध्या तासापेक्षा जास्त उशिराने अग्निशामक दलाची गाडी आली. त्या गाडीमध्ये फक्त ड्रायव्हर होता, फायरमन अथवा मदतीला कोणीही उपस्थित नव्हता, शेवटी जमावानेच गाडीचा वॉटर फ्लो पाईप हाती घेऊन फायरमनचे काम करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले.

यावरून माणगाव नगरपंचायतीचा भोंगळ कारभार व अकार्यक्षमतेचे दर्शन घडते. माणगावकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवतो. सदरील आगीत कोणत्याही प्रकारची मनुष्य आणि झाली नसून पाटबंधारे विभागाच्या बंद पडलेल्या जुन्या गाड्या जळून खाक झाल्याच्या आहेत. अग्निशामक दलाची गाडी ही माणगावच्या माणगाव मध्ये अर्ध्या तासात पोहोचू शकत नाही तर माणगाव तालुक्यात काय पोहोचणार अशा प्रकारचा सवाल माणगाव तालुक्यातील जनतेच्या मनात उद्भवत आहे.

# मनसेचे अधिवेशन उठले झाडांच्या जीवावर; लहान झाडांचा झेंड्यांना आधार

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाचे वार्षिक वर्धापनदिन सोमवार दिनांक ९ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी किल्ले रायगडच्या पायथ्याला होत आहे. मात्र या अधिवेशनासाठी किल्ले रायगड महामार्गालगत मनसेच्या वतीने लावण्यात आलेले मोठमोठे झेंडे हे महामार्ग लगत लावलेल्या लहान झाडांच्या मुळावरती उठले आहेत. या झाडांना बांधून हे झेंडे लावल्यामुळे झाडांना ईजा होईलच मात्र ही झाडे मरण्याचीदेखील शक्यता आहे.

पक्षवाढीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाने वेगवेगळा युक्ता लढवल्या आहेत. कधी रेल्वेचे इंजिन उजव्या बाजूने तर कधी डाव्या बाजूने, कधी मनसेचा तिरंगा झेंड्याच्या जागी छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा, तर आता यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या किल्ले रायगडच्या पायथ्याला पाचाड या ठिकाणी येत्या ९ मार्च रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वर्धापनदिन अधिवेशन घेऊन पक्ष उभारीला बळकटी मिळणाचा केविलवाना प्रयत्न होत असला तरी, या त्यांच्या अधिवेशनामुळे किल्ले रायगड कडे जाणाऱ्या महाड रायगड महामार्ग लगत लावण्यात आलेल्या लहान रोपांना मात्र धोका निर्माण झाला आहे.

याप्रकरणी महामार्ग विभागाच्या सहाय्यक कार्यकारी अभियंता अक्षरा ढाके जगताप यांना याप्रकरणी विचारणा केली असता आमच्याकडून कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नाही, असे ते म्हणाले.

# खोपोली पोलीस ठाण्याचा कारभार महिला पोलिसांच्या हाती!

**चौक : प्रतिनिधी**



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत खोपोली पोलीस स्टेशनच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा अभूतपूर्व सन्मान करण्यात आला. नगरपरिषदेच्या नगरसेविका, डॉक्टर्स, परिचारिका, सामाजिक कार्यकर्त्या, महिला पोलीस कर्मचारी, महिला सफाई कामगार, महिला खेळाडू तसेच आदिवासी महिला भाजी विक्रेत्या अशा विविध स्तरातील महिलांचा यावेळी पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे दिव्यांग मुला-मुलींना सन्मानपूर्वक आमंत्रित करून त्यांचे कौतुक करण्यात आले. .

महिला दिनानिमित्त खोपोली पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांच्याकडे प्रतीकात्मक चार्ज सोपविण्यात आला आणि पोलीस स्टेशनमधील सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी समर्थपणे सांभाळल्या. यासोबतच उपस्थित महिलांसाठी स्नेह भोजनाचे आयोजन देखील करण्यात आले होते.

यावेळी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी सांगितले की, नारी शक्ती ही समाजाची जननी आणि भगिनी या दोन्ही स्वरूपात महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असते. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात महिलांचे स्थान अमूल्य आणि कायमस्वरूपी असते; मात्र जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळाल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

# माणगाव येथे तीन दिवसीय डायलेसिस शिबिर

**माणगाव : बातमीदार**

भारतीय जनता पार्टीचे दक्षिण रायगड जिल्हा महामंत्री व रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या माध्यमातून माणगाव येथील डॉ.तुषार शेट यांच्या बँक ऑफ इंडिया जवळील डायलेसिस सेंटर मध्ये दिनांक ८ ते १० मार्च २०२६ पर्यंत रुग्णांसाठी मोफत डायलेसीस शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना युवानेते निलेश थोरे यांनी सांगितले कि, सतीश धारप साहेब हे कायमच जिल्ह्यातल्या सर्व गोरगरीब,गरजू लोकांना मदतीचा हात देत असतात. त्यांना स्वतःलाही शारीरिक मर्यादा असतानाही ते सतत जनकल्याणाकरीता कष्ट घेत असतात.त्यांच्या वाढदिवशी जाहिराती,होर्डिंग अश्या पद्धतीचे अनावश्यक खर्च न करता समाजातील ज्या लोकांना मदतीची गरज आहे अश्या लोकांपर्यंत पोहोचून त्यांना मदतीचा हात देउन शुभेच्छा देत आहोत.त्यामुळे आम्ही मोफत डायलेसीस शिबिराचे आयोजन केले आहे.

# बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वच्छता मोहीम

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील बोर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रा त आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा परिषद नवनिर्वाचित सदस्य ज्योती रमेश नागावकर तसेच पंचायत समिती माजी. सभापती रमेश नागावकर यांच्या पुढाकाराने स्वच्छता अभियान यशस्वीरीत्या राबविण्यात आले.

सदर कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर, माजी पं.स. सभापती रमेश नागावकर, ग्रुप ग्रामपंचायत सरपंच सपना जायपाटील, मुरुड तालुका गटविकास अधिकारी राजेंद्र कुमार खताळ ,पंचायत समिती कृषी अधिकारी वसंत दळवी तसेच ग्रामीण आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी ज्योती नागावकर उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, स्वच्छता ही केवळ सवय नाही, तर ती समाजाच्या प्रगतीची पहिली पायरी आहे.





# अलिबाग नगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा भाजपकडून सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि भाजपचे रायगड जिल्हा महामंत्री सतीश धारप यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टी, अलिबाग शहर यांच्या वतीने नगरपालिकेतील स्वच्छता कर्मचारी महिलांचा तसेच विविध क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांचे कौतुक करण्यात आले.

समाजाच्या उभारणीत महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा छोटासा प्रयत्न करण्यात आल्याचे भाजप अलिबाग शहर अध्यक्ष आणि नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा यांनी सांगितले. या कार्यक्रमास अलिबाग नगर परिषदेचे नगरसेवक अंकित बंगेरा तसेच सुनील दामले, ॲड. वैशाली बंगेरा,पल्लवी जोशी, तनुजा पेरेकर, विजेता सारंग, धीरज ओसवाल, ॲड. मानस कुंटे, प्रसाद वैशंपायन, निखिल चव्हाण उपस्थित होते.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये भाजप महिला मोर्चातर्फे नारीशक्ती उत्सव

या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील, नगरसेवक अजय बहिरा, महिला मोर्चा शहराध्यक्ष तथा नगरसेविका रूचिता लोंढे, माजी महापौर तथा विद्यमान नगरसेविका डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, प्रीती जॉर्ज, प्रतिभा भोईर, अस्मिता घरत, शिवानी घरत, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत तसेच स्वाती कोळी यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या. महिलांच्या कलागुणांना व उद्योजकतेला प्रोत्साहन देत समाजात त्यांचा सन्मान वाढवण्याच्या उद्देशाने आयोजित नारीशक्ती या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# पनवेलमधील कानपोली येथे चावडी बैठक

**पनवेल : वार्ताहर**



महाराष्ट्र शासनच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत कानपोली येथील राम मंदिर येथे तहसीलदार मिनल भामरे–भोसले यांची ' चावडी बैठक आयोजित करण्यात आली होती. नायब तहसीलदार राजश्री जोगी, मंडळ अधिकारी बापू सरगर व मंडळ तळोजेमधील सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच कानपोली गावचे सरपंच मदन मते व उपसरपंच रामचंद्र पाटील याच्या समवेत कानपोली गावचे ग्रामस्थ उपस्थित होते

यावेळी अभियानातील सर्व महसूल विभागाच्या सेवा जसे डिजिटल सातबारा वाटप, विविध प्रकारचे दाखले, जिवंत सातबार मोहिमेतील वारस नोंदी, निराधार लोकांशी संबधित योजनांशी संबधित लाभ, सातबारा सबंधित सुधारणा इत्यादी अशा एकूण १५ सेवाबद्दल इतंभूत माहिती त्याना दिली. 'चावडी बैठक 'ही तशी पूर्वीपासून चालत आलेली संकल्पना या निमित्ताने पुन्हा एकदा ग्रामस्थाच्या वेळेनुसार नियोजित करून नाविन्यपूर्ण म्हणून अमलात आली.

साधारणत: नियमित शासकीय वेळेत रोजगार संबधित कामात ग्रामस्थ व्यस्त असल्याने सर्वसमावेशक बैठक घेऊन सर्वांपर्यंत पोहचणे शक्य होत नाही. त्यामुळे साधारणत: रात्रीच्या वेळेत नियोजित केलेल्या या सभेत तहसिलदार मिनल भामरे –भोसले यांचे पूर्ण मार्गदर्शन लोकाना लाभले. तसेच या बैठकीत गावातील स्त्रिया, पुरुष, तरुण मुले व वृध्द यांचा एकत्रित सहभाग दिसून आला व जास्तीत जास्त लोकाना सुद्धा त्यांच्या समस्या, अडीअडचणी महसूल विभागातील अधिकार्यांपर्यंत थेट चर्चा करून मांडता आल्या. तहसीलदार मिनल भामरे भोसले यांनी लोकांच्या समस्या जाणून घेऊन अभियानातील सेवेतून त्यावर कसा मार्ग काढता येईल यावर ग्रामस्थाना मार्गदर्शन केले.

# एमएनएम विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालयात जागतिक महिला दिन हा महिला सबलीकरण आणि सक्षमीकरण याचे महत्त्व अधोरेखित करणार्‍या विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला.



या प्रसंगी प्राथमिक विभागातर्फे विशेष परिपाठाचे नियोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त कर्तबगार, धाडसी, निडर, आत्मनिर्भर तसेच समाजामध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाने ठसा उमटवणार्‍या विविध प्रभावशाली महिलांबद्दल आपली मनोगते भाषणाद्वारे व्यक्त केली. महिलांचे आजच्या समाजातील स्थान व त्यांनी केलेल्या विविध क्षेत्रातील प्रगती यावर आधारित नाटिकेचे तसेच नृत्याचे सादरीकरण इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांनी केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी महिलांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्याचा हा दिवस असून विद्यार्थिनींनी कर्तुत्ववान, महिलांचा आदर्शाचा अंगीकार करावा आणि समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच आजच्या काळात महिला शिक्षण, विज्ञान, क्रीडा आणि राजकारण अशा अनेक क्षेत्रांत पुढे येत आहेत असे नमूद केले.

शाळेच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विद्यार्थ्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन परेश पावसकर यांनी केले. कार्यक्रमास प्रतिसाद लाभला.

# पनवेल महापालिकेतर्फे बचत गटांच्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवार ७ मार्च रोजी उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यात आले.



यावेळी महापालिका सदस्य दर्शना भोईर, मोनिका महानगर, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, उपायुक्त मंगला माळवे, सहायक आयुक्त डॉ.रूपाली माने, अधिक्षक कविता मोकल, डेएनयुएलएमचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी, व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महापौर नितिन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटाने उत्पादित केलेल्या विविध वस्तुंचे विक्री व प्रदर्शन शनिवार, रविवार सोमवार तीन दिवस आयोजित करण्यात आले आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

या बचत गटाच्या उत्पादन मेळाव्यामध्ये खाद्यपदार्थ, दागिने, लोकरीच्या वस्तू, मोत्याच्या वस्तू, बेडशीट, कपडे, आयुर्वेदिक उत्पादने , साड्या, सुवासिक उदबत्ती अशा विविध वस्तूंची विक्री करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट द्यावी असे आवाहन अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे केले आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिके तर्फे १४ वर्षे वयोगटातील मुलींकरीता एचपीव्ही (ह्युमन पॉपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहीमेचा शुभारंभ महिला दिनाचे औचित्य साधून आज दिनांक ८ मार्च रोजी उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे, महापालिका सदस्य दर्शना भोईर, अजय बहिरा ,प्रिती जॉर्ज, प्रतिभा भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत गावदेवी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १ येथे करण्यात आला.

एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा उद्देश गर्भाशयमुखाच्या कर्करोगास प्रतिबंध करणे हा आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या सर्व १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावरती सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत पुढील ३ महिन्यांपर्यंत ही मोहीम राबवली जाणार आहे. एचपीव्ही लसीकरण १४ वर्षे वयोगटातील (ज्यांनी १४ वर्षे पूर्ण केलेली आहेत व १५ वर्षे पूर्ण केलेली नाहीत) मुलींना देण्यात येणार आहे. एकूण लोकसंख्येच्या १ % लाभार्थी ही मोहिमेकरीता अपेक्षित लाभार्थी असतील. पनवेल महानगरपालिकेकडून 'एचपीव्ही' लसीकरणास सुरुवात झाली असून महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त मुलींनी लाभ घेण्याचे आवाहन मूख्य वैद्यकिय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी केले आहे. शुभारंभ कार्यक्रमास माता बाल संगोपन अधिकारी डॉ. गणेश नायर, वैद्यकिय अधिकारी डॉ.रेहाना मुजावर, आरोग्य केंद्राचे कर्मचारी, आशा सेविका उपस्थित होते.



# मातृत्व ते नेतृत्व : स्त्रीच्या प्रवासाचा तेजस्विनी सन्मान

## आदर्श शैक्षणिक समूहाकडून महिला दिनानिमित्त नारीशक्तीचा जागर

**कळंबोली : बातमीदार**

जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीशक्तीचा, तिच्या कर्तृत्वाचा आणि प्रेरणादायी प्रवासाचा गौरव करणारा अविस्मरणीय सोहळा आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल, आदर्श महिला मंडळ, पदवीधर प्रकोष्ठ भाजपा, महिला मोर्चा भाजपा पनवेल आणि सुवर्ण सखी महिला मंडळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मातृत्व ते नेतृत्व स्त्रीच्या प्रवासाचा सन्मान या विशेष कार्यक्रमात तेजस्विनी सन्मान २०२६ अंतर्गत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांचा गौरव करण्यात आला.



महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्राप्त झालेल्या तब्बल २२४ नामांकनांमधून २१ विविध क्षेत्रांतील २२ तेजस्विनींची निवड करून त्यांच्या जिद्दीचा, संघर्षाचा आणि कर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला. प्रत्येक सन्मानित महिलेची यशोगाथा ही केवळ तिची वैयक्तिक कथा नसून हजारो महिलांसाठी प्रेरणेचा दीप आहे. महाराष्ट्राचे लाडके, अभ्यासू आणि लोकप्रिय अभिनेते, दिग्दर्शक व सूत्रसंचालक चला हवा येऊ द्या फेम डॉ. निलेशजी साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सादर झालेला वहिनीसाहेब सुपरस्टार हा विशेष कार्यक्रम प्रेक्षकांसाठी आनंदाचा आणि उत्साहाचा अविस्मरणीय क्षण ठरला. आमदार तथा भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी उपस्थिताना ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमासाठी १२०० हून अधिक महिलांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाला प्रमिला पाटील (उपमहापौर, पनवेल महानगरपालिका), प्रिया मुकादम (जिल्हाध्यक्ष, महिला मोर्चा, रायगड), चारुशीला घरत (सरचिटणीस, महिला मोर्चा, रायगड), राजश्री वावेकर (अध्यक्ष, महिला मोर्चा, पनवेल शहर), मोहिनी पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे आयोजक आदर्श शैक्षणिक समुहाचे चेअरमन तथा पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते यांच्या पुढाकारातून हा सोहळा संस्मरणीय ठरला. प्राचार्य डॉ.सीमा कांबळे यांनी केलेल्या काव्यत्मक सुत्रसंचलनाने कार्यक्रमाला एक वेगळीच रंगत प्राप्त झाली.

# सीकेटी विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सी.के.टी. विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी महिला पालकांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच कमी वयात आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्योती चंद्रे आणि आरती भोसले यांचा सन्मान करण्यात आला.



कार्यक्रमात पनवेलच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनी महिला दिनाचे महत्त्व स्पष्ट केले, तर डॉ. निलिमा भंडारकर यांनी सुजाण पालकत्व व मुलांच्या सकस आहाराबाबत मार्गदर्शन केले. ज्योती चंद्रे यांनीही विद्यार्थ्यांना व पालकांना प्रेरणादायी विचार मांडले. यावेळी गायिका गीता रानी, आरती भोसले, गायक हनुमान पाटील आणि रुपेश मढवी यांनी सादर केलेल्या गीतांच्या ऑर्केस्ट्राने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिर

**पनवेल : बातमीदार**

जागतिक महिला दिना निमित्त शिवसेना वैद्यकीय कक्ष करंजाडेच्या वतीने आरोग्य शिबीर आयोजित केले होते. नागरिकांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हा प्रमुख विनोद साबळे , पनवेल मनपा नगरसेविका सायली सरक, शहर प्रमुख मिरेंद्र शहारे, वैद्यकीय जिल्हाप्रमुख राजू नलवडे, महिला शहरप्रमुख अंजू सिंह , ग्रा प सदस्य प्रीती शहारे, मा सरपंच राजश्री साबळे, उर्मिला धुमाळ, साहिल नाईक, विभागप्रमुख रवी पाटील, राहुल सुखसे तसेच अनेक बंधू भगिनी उपस्थित होते.

विविध आजारांची तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. या शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, नेत्र तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. उपस्थित डॉक्टरांनी नागरिकांना योग्य आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने केला मुख्याध्यापिकांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल तालुक्यामध्ये विद्यादान तसेच संस्था चालनाचे पवित्र कार्य करत असणाऱ्या महिला मुख्याध्यापिकांचा सन्मान केला. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील व अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेलच्या शासकीय विश्रामगृहात हा सोहळा संपन्न झाला.



या सोहळ्यामध्ये डी एस पी शिक्षण संस्थेच्या सीनियर कॉलेजच्या प्राचार्या अस्मिता म्हात्रे,जिल्हा परिषदेच्या बामण डोंगरी शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा पाटील, गोखले एज्युकेशन सोसायटी खारघरच्या प्रचार्या डॉक्टर श्रुती काळे जाधव, अल्मा मॅटर पब्लिक स्कूल च्या मुख्याध्यापिका प्रणाली पाटील, चिंचपाडा न्यू इंग्लिश स्कूलच्या रुपाली मोरे, खारघरच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या आकांक्षा उपरेती, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कलाशास्त्रवाणिज्य महाविद्यालय कळंबोली येथे कार्यरत असणाऱ्या आदर्श कार्यालयीन प्रमुख म्हणून दिपीका घोसाळकर तर आदर्श शिक्षिका निवेदिका म्हणून भारती धोंडे यांना सन्मानित करण्यात आले.

# टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

टँकरने दिलेल्या धडकेत ३८ वर्षीय मनोज रामजी कांबळे (रा.घरकुल सोसायटी ऊसर्ली गाव) याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात टँकर क्रमांक एम एच ०४ एचडी ३२७८ वरील चालकाविरोधात सहा मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

६ मार्च रोजी सकाळी दहाच्या सुमारास मनोज कांबळे हा घरातून कामावर जात होता. यावेळी घरकुल सोसायटी, इच्छापूर्ती बिल्डिंग, ऊसर्ली गाव येथे आला असता पाण्याचा टँकर क्रमांक एम एच ०४ एचडी ३२७८ वरील चालकाने टँकर वेगाने चालवत मनोजला समोरून धडक दिली. या अपघातात मनोज कांबळे याचा मृत्यू झाला. या अपघाताची माहिती पनवेल शहर पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी टँकर चालका विरोधात गुन्हा दाखल केला.


## संपादकीय

# विकसित महाराष्ट्राच्या दिशेने

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिमान अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. उद्योग, शेती, सेवा क्षेत्र आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या आधारावर राज्याने प्रगतीची मोठी झेप घेतली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला सुमारे ७.६९ लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प हा राज्याच्या भविष्यासाठी दिशा देणारा महत्त्वाचा दस्तऐवज ठरतो.

**राज्याचा अर्थसंकल्प केवळ महसूल आणि खर्चाचा आकडा नसून विकसित महाराष्ट्र घडवण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून मांडलेला आराखडा आहे. या अर्थसंकल्पात शेती, पायाभूत सुविधा, उद्योग, महिला सक्षमीकरण, पर्यावरण आणि रोजगारनिर्मिती या सर्व क्षेत्रांना संतुलित महत्त्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प तात्कालिक दिलासा देतानाच दीर्घकालीन विकासालाही चालना देणारा ठरू शकतो. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. या अर्थसंकल्पातील सर्वात मोठी घोषणा म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना. या योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात येणार आहे. शेतीत वाढणारा खर्च, बदलते हवामान आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडतात. अशा परिस्थितीत ही कर्जमाफी योजना त्यांना मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. याशिवाय सरकारने आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. ज्या शेतकऱ्यांनी वेळेवर कर्जफेड केली आहे त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हा निर्णय अत्यंत सकारात्मक मानला जात आहे, कारण तो प्रामाणिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देतो. पाणी हे भविष्यातील सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. महाराष्ट्रातील काही भाग दुष्काळग्रस्त असल्यामुळे पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरते. या पार्श्वभूमीवर सरकारने नदीजोड प्रकल्प, जलसंधारण योजना आणि सिंचन प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे. महिलांचा सहभाग वाढल्याशिवाय समाजाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. त्यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना पुढे सुरू ठेवण्यात येणार आहेत. स्वयंमदत गटांना प्रोत्साहन, महिला उद्योजकांना आर्थिक मदत, प्रशिक्षण कार्यक्रम आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे. या योजनांमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळण्यास मदत होईल. राज्यात उद्योग वाढणे आणि गुंतवणूक वाढणे हे आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी विविध धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. नवीन उद्योगांना प्रोत्साहन, सेवा क्षेत्राचा विस्तार, पर्यटन क्षेत्राचा विकास आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाचा अर्थसंकल्प दिवंगत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना समर्पित करून अनोख्या पद्धतीने आदरांजली वाहिली. त्यांनी अजितदादांच्या नावाने गतिमान नागरी सेवा पुरस्कार देण्यात येईल आणि राज्यात त्यांचे भव्य स्मारकदेखील उभारण्यात येईल, अशी घोषणा केली. एकूणच पाहता हा अर्थसंकल्प सर्व घटकांचा विचार करून तयार केलेला दिसतो. यातून महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे.**

# महाराष्ट्र कवी यशवंत दिनकर पेंढारकर



यशवंत दिनकर पेंढारकर हे कवी यशवंत म्हणून प्रसिद्ध होते. बडोद्यात १९४० साली त्यांना राजकवी किताबाने सन्मानित करण्यात आले होते. आज त्यांचा जन्मदिन आहे.

यशवंत दिनकर पेंढारकर हे नामवंत मराठी कवी होते. त्यांनी काव्यवाचन या प्रकाराला प्रसिद्धी मिळवून दिली. १८९९ साली सातारा जिल्ह्यातील तारळे गावी त्यांचा जन्म ९ मार्च १८९९ रोजी झाला. सुरुवातीला सांगलीतील सिटी हायस्कूलमध्ये त्यांनी शालेय शिक्षण सुरू केले, मात्र प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे ते तिथे शिक्षण पूर्ण करू शकले नाहीत. त्यानंतर उदरनिर्वाहासाठी ते पुण्याला आले. इथे त्यांनी अनेक ठिकाणी कारकून म्हणून काम केले. हे करत असतानाच पेंढारकरांनी भरपूर मराठी साहित्य वाचले. त्यातून त्यांना कवितांविषयी प्रेम निर्माण झाले आणि ते स्वत:च कविता करू लागले.

पेंढारकरांना १९२१ साली बडोद्यात झालेल्या साहित्य संमेलनात कवी माधव ज्युलियन, गायक श्रीधर रानडे यांसारखे तोलामोलाचे मित्र मिळाले. या सर्वांची साहित्यिक आवड समान होती. पुण्यातच राहत असल्याने साहित्यिक चर्चांसाठी ते वारंवार भेटू लागले.

कालांतराने पेंढारकारांची कादंबरीकार गजानन त्र्यंबक माडखोलकर, कवी गिरीश (शंकर केशव कानेटकर) आणि डी. एल. गोखले या तिघांशी मैत्री झाली. हाच गट पुढे रविकिरण मंडळ नावाने ओळखला जाऊ लागला. शिक्षणतज्ज्ञ व लेखक विठ्ठल दत्तात्रय घाटे हेही या मंडळाचे काही काळाने सदस्य झाले. पेंढारकर या मंडळाचे संस्थापक सदस्य होते. रविकिरण मंडळाच्या सदस्य कवींनी १९२२ ते १९३५ या कालावधीत काव्यवाचनाचे अनेक जाहीर कार्यक्रम केले. महाराष्ट्रात कविता हा प्रकार लोकप्रिय करण्याचे काम या मंडळींनी केले.

पेंढारकरांचा आवाज सुमधूर होताच, तसेच त्यांच्याकडे काव्यवाचन प्रभावीपणे करण्याची कलाही होती. या मंडळाचे तत्व असे होते की, काव्य हा प्रकार केवळ विद्वज्जन व संवेदनशील व्यक्तींपुरता मर्यादीत राहू नये, तर तो दैनंदीन जीवनाचा एक भाग बनला पाहिजे.

पेंढारकरांनी प्रणयरम्य, सामाजिक, राष्ट्रीयत्वविषयक अनेक कविता केल्या. पुढे तीन गद्य पुस्तकेही लिहिली. त्यांच्या साहित्यकृतींमध्ये यशवंती (१९२१), महाराष्ट्र वीणाझंकार (१९२२), जय-मंगला (१९३१), कंटाणीचे घर (१९४५), यशोधन (१९५६), छत्रपती शिवराय (१९६८), रणदुर्गा झाशीवाली (१९७७) यांचा समावेश आहे. त्यांनी लहान मुलांसाठीही काव्य केले.

सयाजीराव गायकवाडांच्या मृत्यूनंतर १९३९ साली त्यांचे नातू प्रतापसिंह गायकवाड बडोदा संस्थानाच्या गादीचे प्रमुख झाले. त्यावेळी पेंढारकरांनी काव्यकिरीट या खंडकाव्याची निर्मिती केली होती. यामध्ये त्यांनी एका संस्थानाच्या प्रमुखाला त्याच्या जनतेप्रती असणाऱ्या जबाबदाऱ्यांचे वर्णन केले आहे. याबद्दल प्रतापसिंहांनी पेंढारकरांना राजकवी हा किताब बहाल केला.

मुंबईत १९५० साली झालेल्या ३३व्या मराठी साहित्य संमेलनाचेही पेंढारकर अध्यक्ष होते. या संमेलनात प्रथमच साहित्याच्या विविध अंगांबद्दल चर्चा करण्यासाठी विभागीय अधिवेशने घेण्यात आली. साहित्य व शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना १९६९ साली पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यांनी २५ नोव्हेंबर १९८५ रोजी जगाचा निरोप घेतला. (साभार : इंटरनेट)

# विख्यात तबलावादक उत्साद झाकिर हुसेन



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतातील तबलावादक अशी झाकिर हुसेन यांची ओळख राहिलेली आहे. आज त्यांचा जन्मदिन. त्यांचा जन्म ९ मार्च १९५१ रोजी मुंबई येथे, तर प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सेंट मिशेल हायस्कूल, माहीम येथे झाले. पुढे सेंट झेव्हिअर्स महाविद्यालयातून त्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. संगीताचा वारसा त्यांना घरातूनच लाभला होता. त्यांचे वडील जगविख्यात तबलावादक उस्ताद अल्लारखाँ (रख कुरेशी) यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संगीताचे धडे घेतले. बालपणापासून त्यांनी तबलावादनातील विविध बारकावे आणि शैली आत्मसात केल्या. त्यांनी पहिला व्यावसायिक तबलावादनाचा कार्यक्रम वयाच्या बाराव्या वर्षी केला (१९६३).

झाकिर हुसेन यांनी आपल्या तबलावादनातील आंतरराष्ट्रीय कारकिर्दीस १९७०मध्ये प्रारंभ केला. त्या एका वर्षात १५० तबलावादनाचे कार्यक्रम त्यांनी भारतासह विविध देशांत सादर केले. त्यांनी सामूहिक तबलावादनासाठी विख्यात सरोदवादक आशीष खान यांसोबत 'शांतिगट' (१९७०) आणि पुढे इंग्रज गिटारवादक जॉन मॅक्लॉफ्लिन व व्हायोलिनवादक एल्. शंकर यांसोबत 'शक्तिगट' (१९७५) स्थापन केला. शिवाय ते स्वतंत्र (सोलो) तबलावादनाच्या रंगतदार मैफली करत. त्यांच्या वादनशैलीने व सादरीकरणाने त्यांनी भारतात व विदेशात तबला या वाद्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. परंपरा आणि नावीन्य यांचे सुंदर मिश्रण त्यांच्या वादनशैलीत आढळते.

भारतीय आणि पाश्चात्त्य संगीताचे झाकिर हुसेन हे भोक्ते होते. तबलावादनातील त्यांचा जोश, बोटांची किमया आणि बेभानपणा ठळकपणे जाणवतो. सुरांचा अनुनय करताना त्यांनी लाखो रसिकांना आपल्या तालावर नाचविले. अटलांटा (अमेरिका) येथील उन्हाळी ऑलिंपिक क्रीडा-सामन्यांच्या उद्‌घाटनाची संगीतरचना त्यांनी केली (१९९६). तबलावादनास त्यांनी दिलेले मोहक रूप मैफलीचे आकर्षण ठरले.

गुरु-शिष्य परंपरेला ते महत्त्व देत. तबलावादनातील मेरुमणी ठरलेल्या झाकिर हुसेन यांनी अली अकबरखाँ, बिरजू महाराज, रवि शंकर, शिवकुमार शर्मा आदी अनेक श्रेष्ठ गायक, वादक, नर्तक यांना तबलावादनाची साथ दिली. शिवाय त्यांचा स्वतःचा मोठा शिष्यपरिवार आहे. त्यांच्या अनेक ध्वनिमुद्रिका व ध्वनिफिती आहेत. त्यांनी अनेक हिंदी-इंग्रजी चित्रपटांतून तबलावादनाची साथ दिली आहे. ते स्टॅन्फर्ड विद्यापीठात भारतीय शास्त्रीय संगीताचे प्राध्यापक (२००५-०६) आणि अभ्यागत प्राध्यापक (२००७) होते. भारताच्या स्वातंत्र्याला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्याकडे केंद्र शासनाने राष्ट्रगीताची संगीतरचना सुपुर्द केली (२००७).

झाकिर हुसेन यांच्या सांगीतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल भारत सरकारचा पद्मश्री (१९८८), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९१), इंडो-अमेरिकन वॉर्ड (१९९०), नॅशनल हेरिटेज फेलोशिप, अमेरिका (१९९९), पद्मभूषण (२००२), मध्य प्रदेश सरकारचा कालिदास सन्मान (२००६), ग्रॅमी वॉर्ड (२००९), कोनारक नाट्यमंडप (ओडिशा) यांच्यातर्फे जीवनगौरव पुरस्कार (२०१२), भारत सरकारचा पद्मविभूषण (२०२३) आदी मानसन्मान त्यांना लाभले तसेच विविध संगीत महोत्सवांतून जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रसिद्ध इटालियन-अमेरिकन कथ्थक नृत्यांगना आंतोनिआ मिनेकोला हिच्याशी त्यांनी विवाह केला (१९७८). त्यांना दोन सुविद्य मुली आहेत.

झाकिर हुसेन यांचे १५ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ७३व्या वर्षी फुफ्फुसाच्या आजाराने अमेरिकेच्या संयुक्त संस्थानातील सॅन फ्रॅन्सिस्को येथे निधन झाले.

**-सरोजकुमार मिठारी**
(मराठी विश्वकोष)



## बदलते तंत्रज्ञान

# आता तुमची डिजिटल मालमत्ताही करा सुरक्षित



पूर्वी मृत्यूपत्र करताना लोक फक्त घर, जमीन आणि कार यासारख्या जंगम आणि स्थावर मालमत्तेचा विचार करत असत, मात्र काळ बदलला तसतसं लोक डिजिटल मालमत्तेलाही महत्त्व देऊ लागले. यामध्ये सोशल मिडिया अकाउंट्स, ई-बुक्स, शेअर्स, डिजिटल वॉलेट्स आणि क्रिप्टोकरन्सी यांचा समावेश आहे. त्यांची सुरक्षितता आणि योग्य हस्तांतरण आता आवश्यक आहे.

स्मार्टफोन आपल्या जीवनाची मास्टर-की बनले आहेत. बँकिंग ॲप्स, कुटुंबाचे फोटो, टॅक्स रेकॉर्ड्स हे सर्वकाही फोनमध्ये असते. जर फोन लॉक असेल आणि कुटुंबातील कोणालाही पासवर्ड, फेस लॉक किंवा पॅटर्न माहीत नसेल, तर गरज पडल्यास पैसे किंवा महत्त्वाचा डेटा ॲक्सेस करणे कठीण होऊन जाते. म्हणून तुमच्या डिजिटल खात्यांसाठी नॉमिनी ठेवा आणि त्यांना पासवर्ड ॲक्सेस असल्याची खात्री करा.

यामध्ये मदत करण्यासाठी पासवर्ड डायरी ठेवू शकता किंवा पासकोडसाठी आपत्कालीन फोल्डर तयार करू शकता. आझकाल अनेक डिजिटल पासवर्ड आपत्कालीन संपर्क सेट करण्याचा पर्यायदेखील देतात. जर तुम्ही तुमचे खाते दीर्घकाळ वापरत नसाल, तर विश्वासू व्यक्तीला प्रवेश मिळू शकतो.

आता फक्त बँक खातीच नाहीतर सूपीआय लिंक्ड वॉलेट्स, रिवॉर्ड पॉइंट्स आणि अन्न आणि प्रवासाचे ॲप्समधील रोख शिल्लकदेखील मालमत्ता मानली जाते. प्रत्येक डिजिटल वॉलेट आणि फिनटेक ॲपचे रेकॉर्ड ठेवा आणि नॉमिनी अपडेट आहे ते तपासा. यामुळे पैसे कोणत्याही कायदेशीर अडचणीशिवाय योग्य व्यक्तीपर्यंत पोहचतील याची खात्री होईल.

ई-मेल आणि क्लाउड स्टोरेज सुरक्षित करणेदेखील महत्त्वाचे आहे. गुगल इनॲक्टिव्ह अकाउंट मॅनेजरसारखी वैशिष्ट्ये देते आणि ॲपलसुद्धा लेगसी कॉन्टॅक्ट्स देते. आता शेअर्सही पूर्णपणे डिमटेरियलाइज्ड झाले आहेत आणि पेपर शेअर्स सर्टिफिकेटही जुने झाले आहेत. म्हणून तुमच्या डिमॅट खआत्यात फायदेशीर नॉमिनी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

क्रिप्टोकरन्सी आणि डिजिटल चलनाच्या बाबी संवेदनशील असतात. बँक खाते व्यवस्थापक मदत करू शकतात, मात्र क्रिप्टो वॉलेटमध्ये व्यवस्थापक नसतो. जर तुम्ही खासगी की किंवा पासवर्ड गमावला तर पैसे कायमचे जाऊ शकतात. न्यायालये किंवा तांत्रिक तज्ज्ञ ते पुनर्संचयित करू शकत नाहीत.

# गायकनट भाऊराव कोल्हटकर



## निमित्त

लक्ष्मण ऊर्फ भाऊराव बापूजी कोल्हटकर मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ गायकनट राहिले आहेत. त्यांचा जन्म ९ मार्च १८६३ रोजी बडोदे येथे झाला. बापूबोवा कोल्हटकर हे त्यांचे पिता व भागीरथीबाई ही माता. भाऊरावांचे शिक्षण कारकुनी करण्यापुरते झाले होते. बडोदे येथील पोलीस आयुक्तांच्या कचेरीत ते साधे कारकून असले तरी एक उत्कृष्ट गायक म्हणून त्या काळी बडोद्यात त्यांची फार प्रसिद्धी होती. सुंदर रूप आणि गोड आवाज हे त्यांचे गुणविशेष.

अण्णासाहेब किर्लोस्करांनी ३१ ऑक्टोबर १८८० रोजी संगीत शाकुंतल नाटकाचा प्रयोग करून संगीत मराठी रंगभूमीची स्थापना केली. त्या काळात नाटकातील स्त्रीभूमिका पुरुषच करीत. आपल्या नाटकातील स्त्रीभूमिका करण्यासाठी अण्णासाहेबांनी भाऊरावांची निवड केली आणि २० सप्टेंबर १८८२ रोजी भाऊरावांनी वयाच्या अठराव्या वर्षी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केला. त्याकाळी किर्लोस्करांच्या शाकुंतल नाटकात 'शकुंतला' (१८८२), सौभद्र नाटकात 'सुभद्रा' (१८८२) व रामराज्यवियोग नाटकात 'मंथरा' (१८८४) या भाऊरावांच्या स्त्रीभूमिका अतिशय लोकप्रिय झाल्या. 'सुभद्रे'ची भूमिका तर त्यांनी १८८३ ते १८९७ या चौदा वर्षांच्या काळात अखंडपणे केली. महाराष्ट्रातील घराघरांतून त्यांच्या नावाचा उल्लेख आत्मीयतेने 'भावड्या' असा होऊ लागला.

गोविंद बल्लाळ यांच्या विक्रमोर्वशीय नाटकात 'उर्वशी'ची भूमिका (१८८९) केल्यानंतर भाऊरावांनी नायकाच्या भूमिका करण्यास सुरुवात केली. देवल यांच्या शापसंभ्रम नाटकातील 'पुंडरीक' (१८९३) व मृच्छकटिक नाटकातील 'चारुदत्त' (१८९५) श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या पहिल्या वीरतनय नाटकातील 'शूरसेन' (१८९६) आणि देवलांच्या शारदा नाटकातील 'कोदंड' (१८९९) या भाऊरावांच्या लोकप्रिय व गाजलेल्या पुरुषभूमिका होत. गायन आणि अभिनय या दोहोंचाही एकाच वेळी उठाव करण्याची त्यांची ताकद व हातोटी असामान्य होती. त्यांचा आवाज अत्यंत गोड आणि पल्लेदार असून गायनकलेचे त्यांना उत्तम ज्ञान होते. मराठी नाट्यसृष्टीत संगीत नाटके सुरू झाल्यापासून भाऊरावांसारखा चढा, पल्लेदार, गोड आणि सुरेल आवाज मराठी रंगभूमीवर ऐकावयास मिळाला नाही, असे त्यांच्या चाहत्यांचे महणणे आहे.

भाऊरावांनी केलेल्या भूमिकांच्या अभिनयाचे शिक्षण त्यांना गोविंद बल्लाळ देवल यांनी दिले होते. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या मृत्यूनंतर (१८८५) ते किर्लोस्कर नाटक मंडळीचे भागीदार मालक झाले. अण्णासाहेब किर्लोस्करांनी स्थापन केलेल्या संगीत रंगभूमीची परंपरा त्यांनी आपल्या १८-१९ वर्षांच्या कारकीर्दीत चांगल्या प्रकारे समृद्ध केली. त्यामुळे संगीत रंगभूमीच्या विकासाचे आणि उत्कर्षाचे सारे श्रेय भाऊरावांनाच दिले पाहिजे. १७ मार्च १९०० रोजी पुण्याच्या आर्यभूषण नाटकगृहात भाऊरावांनी 'कोदंडा'ची भूमिका केली. हीच त्यांची शेवटची भूमिका व शेवटचे दर्शन. त्यानंतर मे महिन्यापासून जलोदराच्या विकारामुळे त्यांची प्रकृती बिघडली व त्यातच त्यांचे पुणे येथे १३ फेब्रुवारी १९०१ रोजी निधन झाले.


**-व. शां. देसाई**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# कानाची काळजी न घेतल्यास येऊ शकतो बहिरेपणा



बरेच लोक बराच काळ कानातील कोणत्याही समस्येकडे दुर्लक्ष करतात, परंतु यामुळे कानांचे नुकसान होऊ शकते. अशा काही दैनंदिन सवयीदेखील आहेत ज्या कानाच्या नुकसानीपासून ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम करतात. अनेक लोक आंघोळीनंतर किंवा खाज सुटल्यावर कापसाच्या कळ्यांनी कान स्वच्छ करतात. परंतु ते कधीही कानाच्या छिद्रात घालू नयेत. असे केल्याने घाण बाहेर येण्याऐवजी आत ढकलली जाते, ज्यामुळे अडथळा किंवा कानात संसर्ग होऊ शकतो. याशिवाय काडेपेटीच्या काड्या, हेअरपिन यासारख्या गोष्टी कानात कधीही टाकू नयेत. तज्ञांच्या मते, कापसाच्या कळ्यांचा वापर केवळ बाहेरील भागापुरताच मर्यादित असावा.

जर तुमच्या कानात वारंवार घाण जमा होत असेल तर कान-नाक-घसा तज्ञाकडून ती स्वच्छ करा. कानात तेल टाकणे फायद्याचे आहे असे लोक सहसा मानतात, परंतु तसे नाही. तेलामुळे कानात बुरशीजन्य किंवा बॅक्टेरियाचे संक्रमण होऊ शकते. अशीही प्रकरणे आहेत ज्यात कानात तेल टाकल्यामुळे संसर्ग झाला आहे. अशा परिस्थितीत डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कानात कोणताही द्रव न टाकणे महत्वाचे आहे. कान हे अतिशय संवेदनशील अवयव आहे, त्यामुळे त्यांची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. कान साफ करताना कधीही काडी, पिन, मॅचस्टिक किंवा तीक्ष्ण वस्तू वापरू नयेत.

अनेकजण कापसाच्या काडीने कान साफ करतात, पण त्यामुळे मळ आत ढकलला जाऊ शकतो आणि कानाच्या पडद्याला इजा होण्याचा धोका असतो. प्रत्यक्षात, कानातील मळ हा नैसर्गिक संरक्षणाचा भाग आहे जो धूळ व जंतूंना आत जाण्यापासून थांबवतो. सामान्य परिस्थितीत कान स्वतःच स्वच्छ होतात. बाहेरील भाग (कानाची पाळी आणि बाह्य भाग) स्वच्छ करण्यासाठी मऊ कापडाने किंवा कोमट पाण्याने हलकेच पुसणे पुरेसे असते. जर कानात मळ जास्त साचला असेल आणि ऐकण्यात अडथळा येत असेल, तर घरी स्वतः प्रयोग न करता तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कान, नाक आणि घसा तज्ञ डॉक्टर सुरक्षित पद्धतीने मळ काढू शकतात.

कानाच्या आरोग्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. पोहायला गेल्यानंतर कान कोरडे ठेवणे, जोरात आवाज टाळणे आणि हेडफोनचा मर्यादित वापर करणे फायदेशीर ठरते.

# भारतीय हस्तकलेची परंपरा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण -मंत्री सावकारे

## सीबीडी बेलापूर येथे नॅशनल गांधी शिल्प बाजारचे उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय हस्तकलेची परंपरा अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण असून कारागिरांच्या कष्टातून साकारलेल्या या कलेचे जतन आणि प्रोत्साहन करण्यासाठी 'नॅशनल गांधी शिल्प बाजार'सारखे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांनी केले.

सीबीडी बेलापूर येथील अर्बन हाट येथे आयोजित करण्यात आलेल्या 'नॅशनल गांधी शिल्प बाजार' या सर्व-भारतीय हस्तकला महोत्सवाचे उद्घाटन मंत्री सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत विकास आयुक्त (हस्तकला) कार्यालयाच्या प्रायोजक तत्वाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या या भव्य प्रदर्शनाचे आयोजन महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादित यांच्या वतीने करण्यात आले आहे.




याप्रसंगी बोलताना सावकारे म्हणाले की, भारतातील पारंपरिक हस्तकला ही देशाच्या सांस्कृतिक वारसेचा महत्त्वाचा भाग आहे. भारतात आढळणारी कलाकुसर जगातील इतर कोणत्याही ठिकाणी सहजपणे पाहायला मिळत नाही. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वाढत्या वापरामुळे पारंपरिक हस्तकलेवर काही प्रमाणात परिणाम झाला असला, तरी या कलेमध्ये कारागिरांची मेहनत, कौशल्य आणि संस्कृतीची परंपरा दडलेली असते. त्यामुळे हस्तकला वस्तू तयार करण्यासाठी अधिक वेळ लागतो आणि त्यांची किंमतही तुलनेने जास्त असते. मात्र ती किंमत कारागिरांच्या परिश्रमांची असते, असे त्यांनी नमूद केले.

या प्रदर्शनात काही दिव्यांग कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंचाही समावेश असल्याचे सांगत त्यांनी त्यांच्या कौशल्याचे विशेष कौतुक केले. तसेच बेलापूर येथील अर्बन हाट उभारण्यासाठी स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी केलेल्या प्रयत्नांचेही त्यांनी अभिनंदन केले. श्री.सावकारे यांनी सिडको प्रशासनाला अर्बन हाट परिसरात आवश्यक दुरुस्ती व सुधारणा करण्याचे आवाहन केले. योग्य दुरुस्ती आणि देखभाल झाल्यानंतर ही जागा आणखी आकर्षक आणि उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले. मोठ्या शहरांमध्ये अशा प्रकारचे हाट विकसित करणे आवश्यक असून, त्यामुळे कारागिरांना त्यांच्या वस्तू थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

'नॅशनल गांधी शिल्प बाजार' या उपक्रमांतर्गत देशभरातील सुमारे १५० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या प्रदर्शनात देशातील विविध राज्यातील सुमारे १५० कारागिरांनी सहभाग नोंदवला असून शिल्पगुरू, राष्ट्रीय व राज्य पुरस्कारप्राप्त तसेच नामवंत कारागिरांनी सादर केलेल्या विविध पारंपरिक हस्तकला वस्तू येथे उपलब्ध आहेत.

या प्रदर्शनात आर्ट मेटल वेअर, बांबू व काठी उत्पादने, गालिचे, शंख-शिंपला हस्तकला, बाहुल्या व खेळणी, भरतकाम, काच हस्तकला, ज्यूट हस्तकला, तंजावर चित्रकला, लाकडी उत्पादने तसेच कोल्हापुरी चप्पल अशा विविध वस्तू नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या प्रदर्शनामुळे देशभरातील कारागिरांना आपली कला सादर करण्यासाठी आणि विक्रीसाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होत आहे. या कार्यक्रमास प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) श्रीमती अंशु सिन्हा, सह व्यवस्थापकीय संचालक सिडकोचे शंतनू गोयल, संचालक डॉ. अजित खैरे, प्रादेशिक संचालक दिपांशू हलदरे, दिपक खांडेकर (महाटेक), पोलीस उपमहानिरीक्षक रविंद्र सिंग आदी उपस्थित होते. आभार प्रदर्शन सहायक संचालक (हस्तकला) चंद्रशेखर सिंग यांनी केले.

# वाशी विभागात १५० अनधिकृत झोपड्यांवर तोडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत झोपड्यांविरोधात वाशी विभाग नवी मुंबई महानगरपालिका यांचे मार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व मा. उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड, यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



वाशी गाव परिसरातील सेक्टर ३० येथील केरला भवन समोरील भुखंडावर हाय टेन्शन वायरखालील नमुंमपा व सिडकोच्या जागेवर अनधिकृत झोपडपटटयांवर तोडक कारवाई करून एकूण १५० अनाधिकृत झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. या धडक मोहिमेसाठी वाशी विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, अतिक्रमण पोलीस, सुरक्षा रक्षक, मजूर व एक जेसीबीच्या सहाय्याने निष्कासित करण्यात आले.

# मँग्रोव्ह क्लीनअप ड्राईव्हचा २९०वा आठवडा महिलांना समर्पित

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सरसोळे जेट्टी परिसरात एन्व्हायर्नमेंट लाइफ फाउंडेशनच्या पुढाकारातून आणि मँग्रोव्ह फाउंडेशनच्या सहकार्याने सुरू असलेल्या मँग्रोव्ह क्लीनअप ड्राईव्हने २९०वा आठवडा पूर्ण केला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने हा आठवडा सर्व महिला मँग्रोव्ह सैनिकांना समर्पित केल्याचे स्वयंसेवक धर्मेश बराई यांनी सांगितले.

या उपक्रमात १००हून अधिक स्वयंसेवक आणि नागरिकांनी सहभाग घेतला आणि किनारपट्टी परिसरातून ६०० किलोहून अधिक कचरा हटविण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली.

या प्रसंगी एन्व्हायर्नमेंट लाइफ फाउंडेशनचे संस्थापक धर्मेश बराई म्हणाले की, महिलांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजले तर त्या आपल्या कुटुंबाच्या सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवू शकतात. नागरिक जबाबदारीची सुरुवात घरापासूनच होते आणि महिलांची भूमिका त्यात अत्यंत महत्त्वाची आहे. गेल्या पाच वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या मोहिमेतून मुंबई महानगर प्रदेशातील किनारपट्टीवरून हजारो टन कचरा हटविण्यात आला असून १.२५ लाखांहून अधिक नागरिकांनी यात सहभाग नोंदवला आहे.या उपक्रमासाठी मँग्रोव्ह फाउंडेशन यांच्या सहकार्याबद्दल तसेच नवी मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या लॉजिस्टिक सहाय्याबद्दल संस्थेने आभार व्यक्त केले.

# कळंबोलीमध्ये महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**पनवेल: वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने कळंबोली येथे सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रभर समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या आदेशानुसार कळंबोली येथे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, कान-नाक-घसा तपासणी, डोळ्यांची तपासणी तसेच संपूर्ण शरीर तपासणी करण्यात आली. खारघर, नवी मुंबई येथील मेडिकल हॉस्पिटलच्या मुख्य डॉक्टरांसह सुमारे १० जणांच्या वैद्यकीय पथकाने नागरिकांची सविस्तर तपासणी केली. तसेच आवश्यक ते आरोग्य मार्गदर्शनही देण्यात आले. या तपासणीनंतर डॉक्टरांनी नागरिकांना संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्याबाबत मार्गदर्शन केले.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व नगरसेवक रामदास शेवाळे तसेच नगरसेविका सायली सरक यांच्या मार्गदर्शनाखाली हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शेवाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे परिसरातील अनेक महिलांना आणि नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला. कार्यक्रमास स्थानिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ॲमेझॉन थिंक बिग सायन्स कार्निव्हल २०२६ उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे शुक्रवारी (६ मार्च) आयोजित करण्यात आलेल्या ७ व्या 'ॲमेझॉन थिंक बिग सायन्स कार्निव्हल'ला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ॲमेझॉनच्या सहकार्याने आणि 'लर्निंग लिंक्स फाऊंडेशन'च्या माध्यमातून राबवण्यात आलेला हा उपक्रम भारत सरकारच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेशी सुसंगत आहे. या कार्निव्हलने विद्यार्थ्यांना विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने वास्तविक जगातील पर्यावरणीय आणि सामाजिक आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून दिले.



पाच महिन्यांच्या कालावधीत तीन टप्प्यांत राबवलेल्या या कार्निव्हलमध्ये नवी मुंबई महापालिकेच्या शाळांमधील १२ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचा समारोप एका भव्य महाअंतिम सोहळ्याने झाला, जिथे निवडक तरुण नवोन्मेषकांनी त्यांच्या कल्पना आणि कार्यरत प्रकल्प सादर केले. 'शाश्वततेसाठी स्टेम' आणि 'लोककल्याणासाठी तंत्रज्ञान' अशा संकल्पनांच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक बदलासाठी करण्याचे प्रोत्साहन विद्यार्थ्यांना देण्यात आले.

तीन दिवस चाललेल्या 'मिनी सायन्स कार्निव्हल'मध्ये ९० संघानी आपले प्रकल्प सादर केले. उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, सरकारी अधिकारी आणि शिक्षणतज्ज्ञांच्या सखोल मूल्यमापनानंतर, अंतिम फेरीसाठी २० सर्वोत्तम संघांची निवड करण्यात आली. प्रकल्प सादरीकरणाव्यतिरिक्त, कार्निव्हलमध्ये 'स्टेम क्विझ' आणि 'रोबो रेस' यांसारख्या स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. यातून विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता, तांत्रिक ज्ञान आणि सांघिक कार्य दिसून आले. कार्निव्हलला २,५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भेट दिली.

या वेळी 'ॲमेझॉन फ्युचर इंजिनिअर', 'सीडएनएक्सटी', 'म्युझियम ऑफ सोल्यूशन', 'पाय जॅम फाऊंडेशन' आणि 'प्लूटो ड्रोन' यांसारख्या संस्थांच्या स्टॉल्सवरून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाली.लर्निंग लिंक्स फाऊंडेशन'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ओ.ओ.) निखिल पिंगळे यांनी या वेळी महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवल्याबद्दल ॲमेझॉनचे आभार मानले. त्यांनी नवी मुंबई महापालिकेच्या सहकार्याचेही कौतुक केले. ॲमेझॉनच्या डेटा सेंटर्स (एपीएसी)चे नियोजन आणि वितरण संचालक अनुराग खिलनानी यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची या वेळी प्रशंसा केली.



## लक्षवेधी मराठी सिनेतारका

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

चित्रपटसृष्टीत एकत्र काम करता करता वेगवेगळ्या प्रकारची नाती येथे निर्माण होतात. अशीच एक जोडी लीला गांधी आणि जयश्री गडकर या अभिनेत्रींची! कधी कधी तर लीला गांधी नृत्य दिग्दर्शक व कलाकारही आणि जयश्री गडकर कलाकार असाही योग आला. आपल्या प्रत्येकाचे काम चांगले व्हायला हवे अशी जयश्री गडकर यांची प्रामाणिक भावना आणि लीला गांधी त्यांच्या या गुणाचे कायमच कौतुक करीत. अशातच कमलाकर तोरणे दिग्दर्शित लाखात अशी देखणी या चित्रपटात लीला गांधी यांची आईची तर जयश्री गडकर त्यांच्या मुलीच्या भूमिकेत होत्या. अशी भूमिका साकारायची म्हणून लीला गांधी सुरुवातीस थोड्या घाबरलेल्या होत्या. आणि जयश्री गडकर कोणतीही भूमिका उत्तम साकारतात असे त्यांचे मत, पण आपण चित्रपटाच्या नायिका असूनही जयश्री गडकर यांनी लीला गांधी यांना सांभाळून घेतले. असे खुद्द लीला गांधी हा चित्रपट पूर्ण झाल्यावर बोलून दाखवले. छान जोडी जमल्याने असे काही सकारात्मक घडते हेच खरे.

सुषमा शिरोमणी आणि रेखा या दोघींचीही एकदा जोडी जमली. हा चित्रपट होता फटाकडी (१९८०). चक्क मराठी चित्रपट. या चित्रपटाची नायिका व निर्माती सुषमा शिरोमणी होती. सुषमा शिरोमणी म्हणजे मनात येईल ते तडीस नेण्याचा जबरी बाणा. तिच्या चित्रपटातील हिंदी चित्रपटसृष्टीतील कलाकाराचे फक्कडबाज नृत्य हे तर सिंगल स्क्रीन थिएटर्स अर्थात एकपडदा चित्रपटगृहातील हाऊसफुल्ल गर्दीला मनोरंजनाचा हुकमी फंडा. सुषमा निर्मित व दत्ता केशव दिग्दर्शित 'फटाकडी'साठी जगदीश खेबूडकर लिखित आवो भरल्या बाजारी धनी तुम्ही मला हेरलं... कुठं कुठं जायाचं हनिमूनला हे फक्कडबाज लावणी गीत नृत्य आशा भोसले यांच्या नटखट आवाजात संगीतकार बाळ पळसुले यांनी संगीतबद्ध केले. हे गाणे शहरापासून ग्रामीण भागातील दूरवरच्या खेड्यापाड्यातून लाऊडस्पीकरवरुन हमखास सुपर हिट होणार हे सांगायला कोणत्याही ज्योतिषाची गरजच नव्हती. हे गाणे पडद्यावर साकारायला अदाकारा तशी विशेषच हवी.

रेखाने आपल्या अनेक चित्रपटांतील चित्रीकरणाच्या तारखांतून एक तारीख सुषमा शिरोमणीला द्यावी ही एक ब्रेकिंग न्यूजच. रेखाच्या एकेका तारखेला भावी किंमत असल्याचे ते दिवस. ती तारीख मिळाली आणि परेल येथील राजकमल कलामंदिर स्टुडिओत दिग्दर्शक टी.के. देसाई यांनी सेट लावला.

शूटिंगचे ठरले आणि अचानक त्या दिवशीच काही कारणास्तव महाराष्ट्र बंद घोषित करण्यात आला. रेखाची एकेक तारीख महत्वाची असतानाच ही तारीख फुकट वा वाया जाण्याची भीती. आता करायचे काय? सहजी हार मानेल ती सुषमा शिरोमणी कसली? तिने आपले कॅमेरामन नरोत्तम पटणी आणि आवश्यक तेवढे युनिट आदल्याच दिवशी स्टुडिओत बोलावून रहायची व्यवस्था केली. रेखाचे वांद्र्यातील सी वूड येथील निवासस्थान येथून राजकमल कलामंदिर स्टुडिओत कोणत्याही परिस्थितीत सेटवर यायचेच ठरवले. त्यासाठी ती चक्क आदल्या रात्री जाऊन स्टुडिओत राहिली.

नृत्य दिग्दर्शक कमल व माधव किशन यांनी लावणीचा ठेचा पटकन पकडला. रेखाने स्टेप्स लवकर आत्मसात केल्या. गुणवान कलाकाराचे हे वैशिष्ट्यच असते. गाण्यात सुरुवातीलाच एका प्रेक्षकाकडून आलेल्या शिट्टीला तसेच कडक प्रत्युत्तर दिले. एका दिवसात कुठं कुठं गाण्याचे फर्मास चित्रीकरण झाले.

फटाकडी मसालेदार मनोरंजक चित्रपट. फर्स्ट शोपासूनच सुपर हिट. आणि त्यात रेखाच्या नृत्याचा तडका. शहरातील रेडिओवर तर गावागावांतील यात्रेत, जत्रेत कुठेही गेलो तरी लाऊडस्पीकरवर आहो भरल्या बाजारी धनी मला तुम्ही हेरलं हा तडका कायम.

रेखाच्या कानावर या आपणच धमाकेदार नृत्य केलेल्या या भन्नाट गाण्याची लोकप्रियता पोहचली नसती तर नवलच होते. आपणच नृत्य केलेले गाणे आपणच पहावे असे तिने सुषमा शिरोमणीला सांगितले. रेखा अंधेरीतील आंबोली येथील फिल्मालय स्टुडिओत एका हिंदी चित्रपटाचे शुटिंग करीत असताना तेथील मिनी थिएटरमध्ये खास रेखासाठी या गाण्यापुरते स्क्रीनिंग ठेवले.

तोपर्यंत आयटेम साँग हा शब्दप्रयोग प्रचलित झाला नव्हता. हे मराठीतील पहिले आयटेम साँग म्हणून ओळखले जातेय हे यश केवढे तरी. काही कलाकारांची एकत्र काम करता करता सहकलाकारांशीही जोडी जमते आणि काही सकारात्मक गोष्टी घडतात.

जयश्री गडकर व शांता तांबे या जोडीबद्दल असेच घडले. जयश्री गडकर मराठी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय नामवंत अभिनेत्री तर शांता तांबे यांनी अनेक चित्रपटांतून लहान मोठ्या भूमिका साकारत आपला ठसा उमटवला. विशेष उल्लेखनीय गोष्ट, अनेक चित्रपटांत शांता तांबे या जयश्री गडकर यांच्या सासूच्या भूमिकेत असत.

अनंत माने दिग्दर्शित मानिनी या चित्रपटात या दोघींनी प्रथमच एकत्र काम केले. जयश्री गडकर या आघाडीवरील नायिका होत्या. याचा काहीसा दबाव शांता तांबे यांच्यावर होता. हे जयश्री गडकर यांच्या लक्षात आले. त्या शांता तांबे यांना म्हणाल्या, तू काही काळजी करु नकोस. तू नाटकात एवढं चांगले काम करतेस. भितेस कशाला? तू छान काम करशील याची खात्री आहे. तेव्हापासून त्यांची रुपेरी पडद्यावरील जोडी जमली. अनेक चित्रपटात सासू व सून असे त्यांचे नाते असतानाच कधी त्यांच्या वाड्यातील मोलकरीण, कधी त्या जयश्री गडकर यांच्यावर प्रेम करत. तर कधी रागवतही. प्रत्येक चित्रपटाच्या वेळेस जयश्रीबाई भेटल्यावर म्हणायच्या काय, आज मला किती शिव्या देणार? काय माया वगैरे करणारेस का? प्रेमबिम करणार आहेस का माझ्यावर? यावर शांता तांबे जयश्रीबाईना म्हणत, चित्रपटांत मी तुमच्यावर रागावत असले तरी एरवी माझं तुमच्यावर अतिशय प्रेम आहे.

दत्ता धर्माधिकारी दिग्दर्शित थांब लक्ष्मी कुंकू लावते या चित्रपटातील एका दृश्याच्या चित्रीकरणाच्या वेळची गोष्ट. एका दृश्यात जयश्री गडकर व शांता तांबे यांच्यातील संवाद चित्रीत करण्यात येत होता. एकादा कलाकार असता तर अशा वेळी आपलेच अधिकाधिक क्लोजअप पडद्यावर दिसतील याची काळजी घेतली असती, सहकलाकाराला पाठमोरे ठेवले असते आणि सहकलाकाराचे संवाद असतानाही आपणही त्या फ्रेममध्ये दिसू याची खास काळजी घेतली असती, पण जयश्री गडकर यांनी तसे अजिबात केले नाही. त्यांनी आपल्या संवादाच्या वेळेस शांता तांबे यांना आपल्यासोबत फ्रेममध्ये ठेवले आणि शांता तांबे यांच्या संवादाच्या वेळेस त्यांना क्लोजअपची संधी दिली. आपणही दुसऱ्याच्या कामाची कदर ठेवली तरच त्या कलाकारासोबत आपली जोडी जमते हेच यातून अधोरेखित होत आहे. खास महिला दिनानिमित्त मराठी चित्रपटसृष्टीतील काही प्रसिद्ध नायिकाचे हे किस्से. **(समाप्त)**

# महिला स्वावलंबनासाठी झटणाऱ्या संजीवनी पिंगळे

देशातील महानगरे मुंबई आर्थिक राजधानी, पुणे विद्येचे माहेरघर तसेच नव्याने निर्माण झालेले औद्योगिक व आयटी पार्क यांना जोडणारा खालापूर तालुका मागील काही वर्षे अविकसित होता, मात्र मागील १० वर्षांपासून खालापूर तिसरी मुंबईच्या दिशेने वाटचाल करीत आहे. याचा फायदा शहरी ग्रामीण भागातील तरुण तरुणींना मिळत आहे. ग्रामीण भागातून उदयास येत असलेली नारीशक्ती म्हणून घोडवली गावातील संजीवनी अनिल पिंगळे यांचे नाव चर्चेत आले आहे.



महिलांना स्वावलंबी बनविणे, स्वयंरोजगारासाठी शिक्षण देणे, समस्यांचे निराकरण करणे, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी संजीवनी पिंगळे प्रयत्न करीत आहेत तसेच स्वतः ही शिक्षण क्षेत्रात कार्यरत रहात शालेय मुलांसाठी वाहतूक करण्यासाठी स्कूल बसच्या माध्यमातून कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत.

संजीवनी पिंगळे यांनी आर्थिक साक्षरता सखी–२०१४ महिला पोलीस दक्षता समिती सदस्य म्हणूण काम पाहिले. गावातील ११ ग्रामपंचायत बचत गट स्थापन करणे, १२६ बचतगट स्थापन करण्यात आली. बचत गटांची व वैयक्तीक खाते खोलणे, प्रधानमंत्री सुरक्षा विमा, प्रधानमंत्री, जीवन ज्योती विमा, अटल पेन्शन योजना इत्यादी विमा योजना राबविण्यातही त्यांनी पुढाकार घेतला आहे.

शासकीय योजना राबवणे, आधार कार्ड, ई.श्रम कार्ड, हेल्थ कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, महात्मा ज्योतिबा फुले, जन आरोग्य कार्ड ई–कॅम्प लावणे, बचत महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोती अभियानात महिलांना विक्री व्यवसाय वाढीसाठी निधी उपलब्ध करणे, व्यवसायाकरिता कर्ज प्राप्त करणे, प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत कर्ज प्रशिक्षण अगरबत्ती, मसाले, शिवणक्लास, ब्यूटी पार्लर, झरिवर्क, ज्वेलरी मेकिंग, राखी तयार करणे तसेच ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, सेंद्रिय शेती लागवड राबवणे, भाजीपाला लागवड इ. उपक्रम महिलांची व किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी शिबिर घेतली. महिला दक्षता समिती सदस्य खालापूर अंतर्गत बालविवाह, छेडछोड, लाचलुचपत प्रतिबंधक जनजागृती करणे, रा.जि.प शाळेतील भेटीदरम्यान त्यांचाशी संवाद साधुन गुड टच, ब्रँड टच बालकांचे शोषण याबद्दल मार्गदर्शन करणे, अंधश्रद्धा निर्मूलन यातही त्या कार्यरत आहेत.

■ **अरुण नलावडे**, खालापूर

# समाजकारणी गीता जाधव



महिला दिन साजरा होत असताना महिलांनाही अनेक संधी मिळत असतात, तर काही आपल्या कामाने मिळवतात. अशीच एक महिला उच्चशिक्षित घरात साध्या पद्धतीने गृहिणी म्हणून वावरत गीता जाधव यांनी आपल्या कर्तृत्वाने तळा तालुक्यात विविध विकासकामे व समाजातील अनेक घटकांसाठी वैयक्तिक कामे केली आहेत.

गीता जाधव वाणिज्य शाखेच्या पदवीधर असून त्यांना राजकीय क्षेत्रात जिल्हा परिषद सदस्यपदाला उभी राहण्याची संधी मिळाल्यानंतर त्या विजयी झाल्या. प्रथमच विजयी झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण सभापतीपदी विराजमान झाल्या. राष्ट्रवादी पक्षाने ही संधी दिल्यानंतर खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पती अॅड.उत्तम जाधव यांच्या सहकार्याने त्यांनी हे पद सांभाळताना शासकीय योजनांचा तळागाळातील गरीब गरजू व नागरिकांना लाभ देण्याचा नेहमीच प्रयत्न करून लाभ मिळवून दिले आहे.

गीता जाधव यांनी योग्य व नियोजनबद्ध पद्धतीने कार्यभार सांभाळला. त्यांच्या या केलेल्या कामाच्या जोरावर पुन्हा एकदा त्यांना जिल्हा परिषद सदस्यपदासाठी उमेदवारी मिळाली व त्यातही विजयी होऊन त्यांच्या अनुभवाच्या जोरावर पुन्हा त्यांना महिला बालकल्याण सभापतीपद मिळाले. त्यातही त्यांनी चांगले काम केले व नागरिकांपर्यंत योजना पोहचवून लाभ दिला आहे. एक कर्तृत्ववान व कर्तव्यतक्ष स्त्री म्हणून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत पुन्हा त्या मोठ्या मताधिक्याने विजयी होऊन तिसऱ्यांदा सदस्य झाल्या आहेत.त्यांना सर्व कार्यकर्त्यांचे व नागरिकांचे मिळत असलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

■ **संध्या पिंगळे**, तळा

# संघर्षातून उभ्या राहिलेल्या वर्षा मेथा

संपूर्ण जगभर ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. महिलांच्या कर्तृत्वाचा, जिद्दीचा आणि समाजातील योगदानाचा गौरव करण्याचा हा दिवस आहे. अशाच एका कर्तृत्ववान महिलेची प्रेरणादायी कहाणी म्हणजे वर्षा नितीन मेथा.



वर्षा मेथा या ६० वर्षांच्या असून त्यांचे शिक्षण बारावीपर्यंत झाले आहे. त्या माणगाव येथील रहिवासी आहेत. साधे शिक्षण असूनही आपल्या कुटुंबाच्या व्यवसायात खंबीरपणे उभे राहून त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांचे सासरे स्व. बाळकृष्ण मेथा यांनी सन १९६४ साली बी.एल. मेथा या नावाने वृत्तपत्र एजन्सी सुरू केली. नंतर त्यांनी माणगावमध्ये वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय सुरू केला. या व्यवसायात त्यांना त्यांच्या स्नुषा वर्षा मेथा आणि मुलगा नितीन यांची साथ लाभली. कुटुंबाच्या सहकार्यामुळे हा व्यवसाय हळूहळू वाढत गेला.

सासऱ्यांच्या निधनानंतर नितीन मेथा व वर्षा मेथा यांनी खचून न जाता जिद्दीने व्यवसायाची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी हा व्यवसाय पुढे नेला आणि अधिक विस्तार केला. वाचनाची आवड समाजात निर्माण व्हावी या हेतूने त्यांनी वृत्तपत्रांची विक्री वाढवली.

गेल्या पाच वर्षांपासून वर्षा मेथा स्वतः दररोज सकाळी लवकर उठून दैनंदिन आणि साप्ताहिक वृत्तपत्रांची विक्री करतात. पहाटे ५ वाजल्यापासून सकाळी ८.३० वाजेपर्यंत त्या माणगाव येथील स्टॉलवर उभे राहून ग्राहकांना सेवा देतात. वयाच्या साठाव्या वर्षीही त्यांची कार्यतत्परता आणि शिस्त पाहून प्रत्येकजण प्रेरित होतो. प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता उभे राहण्याची शक्ती प्रत्येक महिलेमध्ये असते,याचे जिवंत उदाहरण म्हणजे वर्षा मेथा.

■ **सलीम शेख**, माणगाव

# समाजकार्यातून महिलांना दिशा देणाऱ्या मिनल ढवळे



रायगड जिल्ह्यातील सामाजिक क्षेत्रात गेली अनेक वर्षे सक्रियपणे कार्य करणारे प्रेरणादायी नाव म्हणजे मिनल ढवळे. महिलांना संघटित करून त्यांना सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन त्यांना नवी दिशा मिळत आहे. सन २००२ साली नामदेव शिंपी समाज महिला मंडळ या संस्थेची स्थापना करण्यात मिनल ढवळे यांनी पुढाकार घेतला.

सुरुवातीला अवघ्या १७ महिलांसह सुरू झालेल्या या मंडळात आज ४०पेक्षा अधिक महिला सक्रिय सदस्य म्हणून काम करत आहेत. या मंडळाच्या माध्यमातून महिलांच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक प्रश्नांवर काम केले जात आहे.

मिनल ढवळे यांनी म्हसळा तालुका आरोग्य समिती तसेच पाणी समितीवर काम करत गावपातळीवरील आरोग्य आणि पाणीपुरवठा विषयक प्रश्नांवर महत्त्वपूर्ण काम केले आहे. शहर स्वच्छ राहावे यासाठी त्या स्वच्छता मोहिमेतही सक्रिय सहभाग घेत आहेत.

सन २०११मध्ये दक्षता समितीवर काम करत त्यांनी सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भूमिका बजावली. त्यानंतर २०२०, २०२१ आणि २०२२ या कालावधीत प्रगती महिला मंडळ, नामदेव शिंपी समाज या संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. २८ एप्रिल २०२२पासून त्या रायगड जिल्हा शिंपी समाज सामाजिक संस्थेच्या कार्यकारिणीवर सहसचिव म्हणून कार्यरत आहेत.




समाजातील विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून समाजकार्यातील त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. सामाजिक कार्याबरोबरच सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातही मिनल ढवळे सक्रिय आहेत. त्या कोकण मराठी साहित्य परिषद शाखेच्या सहसचिव म्हणूनही काम करत आहेत. याशिवाय कलावती आई भजनी मंडळाच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांमध्ये काकड आरती, भजन, कीर्तन अशा विविध उपक्रमांमध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

समाजातील सांस्कृतिक परंपरा जपण्याचे काम त्या निष्ठेने करत आहेत. घरगुती जीवनातही त्या अनेक महिलांसाठी मार्गदर्शक ठरतात.

शाकाहारी–मासाहारी खाद्यपदार्थ, रानभाज्या आणि पारंपरिक पाककृतींबाबत नवविवाहित आणि तरुण मुलींना त्या मार्गदर्शन करतात, त्यामुळे अनेक मुलींसाठी त्या जणू रेसिपी गाईड ठरल्या आहेत.

८ मार्च २०२३ रोजी म्हसळा येथे शिंपी समाज महिला मंडळातर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला होता तसेच २०२६च्या जागतिक महिला दिनानिमित्त केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयातर्फे त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, ही त्यांच्या कार्याची दखल घेणारी अभिमानाची बाब आहे. समाजकार्य, संस्कृती आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या त्यांच्या योगदानामुळे मिनल ढवळे या आज अनेक महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरल्या आहेत.

■ **संजय खांबेटे**, म्हसळा

# शासकीय कर्मचारी अपर्णा तांडेल



स्त्री म्हटली की अनेक भूमिका आल्या. मुलगी, बहीण, पत्नी, आई, सासू अशा अनेक भूमिका एका स्त्रीला निभवाव्या लागतात. अशीच एक महिला आदर्श भूमिका निभावत आहेत, त्या उरण तालुक्यातील चिरनेर गावातले विद्युत वायरमन कै. नरेश रामा ठाकूर यांची ज्येष्ठ कन्या अपर्णा नरेश ठाकूर. वडिलांचा मृत्यूनंतर त्यांच्या जागेवर महावितरण जसखार शाखेत कार्यरत असलेल्या अपर्णा ठाकूर यांनी एसएससी शिक्षण पूर्ण केले. नंतर इलेक्ट्रीक आयटीआय केले. लग्नानंतर अपर्णा पंकज तांडेल या नावाने त्या सर्वांना परिचित झाल्या. सध्या ते वरिष्ठ तंत्रद्य म्हणून पदावर कार्यरत आहेत.

अपर्णा तांडेल एक उत्तम गृहिणी, सरकारी कर्मचारी आहेत. एक मुलगा त्याची सकाळी ७ची शाळा, नवरा ओएनजीसी न्हावा येथे कामाला आहे. घरातली तयारी, दोघांचे डब्बे, घरातले काम आवरून स्वतःची नोकरी सांभाळतात, त्यातच अपर्णा या वसुली पथकात असल्याने रोज प्रत्येक गावात जाऊन महाविरणच्या ग्राहकांना भेटते व भेटून त्या वसुली करतात. अपर्णा यांना कामावर असताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते, पण त्या कधीही निराश झालेल्या नाहीत. वेळच्या वेळी दिलेली वसुली यादी नेहमी पूर्ण करतात तसेच घरी आल्यावर कामाचा ताण –तणाव घराच्या बाहेर ठेवायचं या तत्वाने त्या वागतात.

अपर्णा तांडेल आणि पंकज पंढरीनाथ तांडेल ही आदर्श पती–पत्नीची जोडी आहे. अपर्णा यांच्या पाठीशी त्यांच्या सुख दुःखात त्यांचे पती पंकज तांडेल (चिरनेर, उरण) हे नेहमी उभे असतात. त्यांचे नेहमी सहकार्य असते. एक आदर्श पत्नी, एक आदर्श आई म्हणून त्या सर्वांना परिचित आहेत. अपर्णा यांचा कुटुंबाला अभिमान वाटतो. घरात असताना व घराबाहेर शासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत असताना एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून जनता त्यांच्याकडे पाहते.

# महिला संपादक वैशाली कडू



रायगड जिल्ह्यातील उरणसारख्या छोट्या शहरातून साप्ताहिक चालवणे म्हणजे तारेवरची कसरत! अनेकांनी प्रयत्न केले, अनेकांची वृत्तपत्रे बंद पडली, पण या सगळ्यांना छेद देत वैशाली घनःश्याम कडू यांनी साप्ताहिक प्रांजलच्या माध्यमातून गेली १२ वर्षे उरणमध्ये पत्रकारितेचा झेंडा बुलंद ठेवला आहे.

घर, संसार, जबाबदाऱ्या आणि त्याचबरोबर समाजकारण या सगळ्यांचा समतोल साधत त्यांनी उरणमधून 'प्रांजल'ची ठाम सुरुवात केली. दर सोमवारी नियमित प्रसिद्ध होणारे हे साप्ताहिक आज उरणमधील सर्वसामान्यांचे हक्काचे व्यासपीठ बनले आहे.

अन्यायग्रस्तांच्या वेदनांना शब्द देणे, प्रशासनाच्या ढिलाईवर बोट ठेवणे, सामान्य माणसाच्या प्रश्नांना आवाज देणे हे काम वैशाली कडू यांनी निर्भीडपणे केले. त्यांच्या लेखणीतून अनेक प्रश्न थेट सत्तेच्या दारात पोहचले. त्यामुळे 'प्रांजल' हे केवळ साप्ताहिक न राहता जनतेचा लढवय्या आवाज ठरले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत द्रोणागिरी महोत्सवात द्रोणागिरी पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला साई देवस्थान वहाळतर्फे महिला दिनानिमित्त 'आदर्श महिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान केवळ व्यक्तीचा नसून उरणमधील निर्भीड पत्रकारितेचा आहे, असे त्या मानतात.

१२ वर्षांपूर्वी लावलेले 'प्रांजल'चे छोटे रोपटे आज भक्कम वटवृक्ष बनला आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि लोकहिताच्या प्रश्नांवर थेट प्रहार करणारे हे साप्ताहिक अल्पावधीतच उरणमध्ये प्रभावी ठरले आहे.

लेखणी हीच ताकद आणि सत्य हाच धर्म या भूमिकेतून त्या समाजहितासाठी झुंज देत आहेत. आजपर्यंत वैशाली कडू यांनी आपल्या पत्रकारितेतून गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला न्याय दिला आहे. त्यामुळे एक आदर्श गृहिणी आदर्श संपादक म्हणून त्यांचा सर्वत्र गौरव होत आहे.

# स्वर, संस्कार, स्वावलंबनाचा प्रवास पूनम पाटेकर



आजच्या काळात महिला अनेक क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. कला, शिक्षण, समाजकार्य आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या पूनम पाटेकर या त्यापैकी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. गायिका, संगीत शिक्षिका, महिला उद्योजिका आणि समाजसेविका म्हणून त्यांनी समाजात आपला ठसा उमटवला आहे.

पूनम पाटेकर यांनी B.A., ECCEd तसेच Diploma in Shipping Logistics ही शैक्षणिक पात्रता प्राप्त केली आहे. त्याचबरोबर त्या CSC VLE आणि UIDAI Supervisor म्हणूनही कार्यरत आहेत. संगीत क्षेत्रात त्यांनी संगीत विशारद (हार्मोनियम) द्वितीय पूर्ण केले असून संगीत विशारद (गायन) तृतीयमध्ये शिक्षण घेत आहेत.

संगीत हा त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. मागील २४ वर्षांपासून त्या संगीत क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांनी अनेक गाणी रेकॉर्ड केली असून ४००हून अधिक स्टेज कार्यक्रम सादर केले आहेत. चिपळूण, रत्नागिरी, दापोली, मंडणगड, श्रीवर्धन, गोरेगाव, माणगाव, महाड, उरण आणि वाशी या ठिकाणी त्यांच्या कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

स्पर्धांमध्येही त्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाड आयडॉल (२००८) तसेच उरण द्रोणगिरी आयडॉलमध्ये सलग तीन वर्षे त्यांनी आपली कला सादर केली. Sur Maharashtra Online Singing Competitionमध्ये प्रथम क्रमांक आणि Maharashtra News १८ गायन स्पर्धांमध्ये द्वितीय क्रमांक मिळवून त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अनेक गायन स्पर्धांमध्ये त्या परीक्षक म्हणूनही काम करत आहेत.

संगीत शिक्षणाची आवड लक्षात घेऊन त्यांनी Surganga Music Hub Academyची स्थापना केली. या अकादमीद्वारे सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना गायनाचे शिक्षण दिले जाते. याशिवाय त्यांना शाळेत शिक्षिका म्हणून सात वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी स्वतःचा म्युझिक ग्रुपदेखील तयार केला आहे.

सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्या अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि मूक–बधिर मुलांना आर्थिक व वस्तुरूप मदत करतात तसेच महिलांमध्ये मासिक पाळीविषयी जागृती करण्यासाठी मार्गदर्शन करतात. शाळेच्या सुट्ट्यांमध्ये त्या बालसंस्कार वर्ग घेऊन मुलांना गाणी, प्रार्थना आणि स्तोत्रांद्वारे संस्कार देण्याचे काम करतात.

उद्योजकतेच्या क्षेत्रात त्यांनी Durva Enterprises या Online Service Centreची स्थापना केली असून व्यवसायासाठी लागणारी सरकारी लायसन्स व सर्टिफिकेट सेवा तसेच सर्व प्रकारच्या विमा सेवा उपलब्ध करून देतात. महिलांच्या आरोग्याचा विचार करून त्यांनी FRELAX - Organic Cotton Sanitary Napkins हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमातून त्या Wholesaler d Retailer म्हणून काम करत असून १६ महिलांना घरबसल्या व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या उत्पादनांची उपलब्धता पुणे, मुंबई, नवी मुंबई, अहिल्यानगर, बेळगाव, महाड, वडोदरा तसेच काही मेडिकल स्टोअर्स व बाजारपेठांमध्ये आहे.

महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी अस्तित्व महिला सक्षमीकरण या संस्थेची स्थापना केली आहे. या संस्थेद्वारे महिला उद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात.

कला, शिक्षण, समाजकार्य आणि उद्योजकता या सर्व क्षेत्रांत काम करत पूनम पाटेकर यांनी समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यातून अनेक महिलांना स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा मिळत आहे. जागतिक महिला दिनानिमित्त अशा कार्यकर्त्या महिलांचा गौरव करणे हीच खरी समाजाची प्रगती आहे.

# शिक्षण क्षेत्रातील व्यक्तिमत्व ज्योती पाटील



ज्योती ज्ञानेश्वर पाटील यांनी आपल्या कार्यातून नेतृत्व, कर्तृत्व व प्रभावी वक्तृत्वाची उज्ज्वल परंपरा जोपासली आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना ज्ञानरूपी दागिन्यांप्रमाणे पैलू पाडण्याचे कार्य आजपर्यंत त्यांनी अत्यंत एकनिष्ठेने केले आहे.

ज्योती पाटील यांचे शिक्षण डी.एड., बी.ए., बी.एड., डिप्लोमा इन स्कूल मॅनेजमेंट असे असून २०१३पासून त्या जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट (नेटिव्ह इन्स्टिट्यूट)च्या इंग्लिश मिडीयममध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत व २०२०पासून प्राथमिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

ज्योती पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, संवेदनशीलता, दूरदृष्टी आणि कार्यतत्परता यांचा सुंदर संगम दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्या केवळ शिक्षणच देत नाही, तर संस्कार, मूल्ये आणि आत्मविश्वासही देत असतात. बुद्धिचातुर्य, अचूक निर्णयक्षमता आणि व्यवस्थापन कौशल्य यामुळे ज्योती पाटील या अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य करत आहेत . कठीण परिस्थितीतही शांतपणे योग्य निर्णय घेण्याची त्यांची क्षमता सर्वांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. ज्ञानसागरात मुक्त विहार करणाऱ्या राजहंसांना ज्ञानरूपी अमृतकण पोहचविणाऱ्या ज्योती पाटील यांना सन २०२३–२४चा संस्थेचा के. श्री. दादासाहेब तात्याबा सातपुते स्मृती पुरस्कार तसेच श्री. ज्ञानेश्वर तुकाराम मेटकरी पुरस्कृत आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ज्योती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावत असून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, स्पर्धात्मकता आणि नैतिक मूल्यांची जोपासना होत आहे.

# व्यावसायिका रोशनी गुरव



सामाजिक क्षेत्रातून शाळेसाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न ज्योती पाटील करत आहेत. त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे शिक्षकवर्गात उत्साह, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि पालकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्यामुळे संस्थेचे नावदेखील उज्वल झाले आहे. शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून त्या सर्वांना सुपरिचित आहेत.

एक गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिका म्हणून रोशनी गुरव यांनी आपले घर सांभाळताना खूप संघर्ष करून टेलरिंग क्षेत्रात काम करून आपले नाव व्हावे याकरिता काहीतरी नवीन करावे म्हणून नऊवारी साडीचे तीन ठिकाणी प्रशिक्षण घेतली. मागील सात–आठ वर्षांपासून उरण बाझारपेठेत नऊवारी साडी शिवण्याचे काम करत आहेत. आज त्यांच्याच नावाने रोशनी नऊवारी साडी दुकान प्रसिद्ध आहे.

उरण शहरात नऊवारी साडी शिवण्याचे एकमेव दुकान असा त्यांचा प्रवास चालू आहे. आपले नाव करून एक यशस्वी गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिका म्हणून त्यांनी त्यांची ओळख निर्माण केली आहे. आदर्श गृहिणी, आदर्श पत्नी अशा वेगवेगळ्या भूमिका निभावत. त्यांनी व्यवसायात उंच गगन भरारी घेतली आहे. विश्वास, प्रामाणिकपणा, कार्यतत्पर, ग्राहकांना नम्रतेने बोलणे, वेळच्या वेळी सर्व कामे करणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्य आहेत. सर्वसामान्य गृहिणी ते एक यशस्वी व्यावसायिक म्हणून त्यांची सर्वत्र ओळख आहे.

महिलांच्या गरजा ओळखून त्यांनी त्या गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने महिलांना चांगली सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने व्यवसायात प्रवेश केला व त्या यशस्वीसुद्धा झाल्या आहेत. त्यांच्या या आदर्श व्यक्तिमत्वाची सर्व महिला प्रेरणा घेत आहेत. आदर्श घेत आहेत.

■ **विठ्ठल ममताबादे**, उरण

# महिला मिनी मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## नवी मुंबईतील स्पर्धेत १३००हून अधिक जणींचा सहभाग



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या सहयोगाने डॉ.डी. वाय पाटील युनिव्हर्सिटी अंतर्गत स्कूल ऑफ हॉस्पिटॅलिटी अ‍ॅण्ड टुरिजम स्टडिज यांच्या माध्यमातून महिला मिनी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. यामध्ये विविध वयोगटातील १३००हून अधिक महिलांनी सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केला.

महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या महिला मिनी मॅरेथॉनव्दारे स्वच्छ व हरित नवी मुंबई साकारण्याचा निश्चय करण्यात आला. डॉ.डी.वाय. पाटील स्टेडियमपासून सुरू करण्यात आलेली ही पाच किमी अंतराची महिला मिनी मॅरेथान नवी ऊर्जा देणारी असते, असे मत सहभागी महिला धावपटूंनी व्यक्त केले.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय यांच्यामार्फत प्राप्त सूचनांस अनुसरून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त १४ मार्चपर्यंत विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून लोकसहभागातून आयोजित करण्यात आलेली ही महिला मिनी मॅरेथॉन डॉ. डी.वाय.पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. विजय पाटील यांच्या संकल्पनेतून, उपाध्यक्ष डॉ. शिवानी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबविण्यात आली.

यावेळी शुभेच्छा देताना महापौर सुजाता पाटील यांनी जागतिक महिला दिन प्रतिकात्मक रितीने एक दिवस साजरा केला जात असला तरी प्रत्येक दिवस हा महिलांच्या सन्मानाचा असतो, असे सांगितले. स्त्रीला नवनिर्मितीचे वरदान असते. त्यामुळे स्त्रीशक्तीचा जागर अशा कार्यक्रमांतून होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. उपायुक्त डॉ. अजय गडदे (घनकचरा व्यवस्थापने), अभिलाषा म्हात्रे (क्रीडा) आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

'घे भरारी' शिर्षकांतर्गत आयोजित या महिला मिनी मॅरेथॉनमध्ये निधी कनोजिया हिने प्रथम पारितोषिक पटकाविले. भूमी म्हात्रे यांनी द्वितीय व एकता राजभर यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. महिलांनी उत्साहाने सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश प्रसारित केला व आरोग्यपूर्ण जीवनाचे महत्त्वही अधोरेखित केले.



# शुटिंग बॉल स्पर्धेत सिंधुदुर्ग संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील माणकुले येथे ए-वन संघाच्या वतीने आयोजित रायगड जिल्हा आणि कोकण विभागीय शुटिंग बॉल स्पर्धेत सिंधुदुर्ग संघाने विजेतेपद पटकाविले.

द्वितीय क्रमांक वीर बहिरीदेव बहिरीचा पाडा, तृतीय मॉडेल संघ रांजणखार, चतुर्थ विद्युत संघ मांडवखार, पाचवा बीएमसी मुंबई, सहावा यजमान ए-वन संघ माणकुले, सातवा छत्रपती शिवाजी संघ माहिम आणि आठवा क्रमांक कल्याण संघाने प्राप्त केला. उत्कृष्ट शुटर रुत्विक नेमन, उत्कृष्ट डिफेसर स्वप्नील पाटील, उत्कृष्ट नेटमन सुशील पाटील यांनीही यश संपादन केले.

स्पर्धेस योजना ठाकूर, जगन्नाथ म्हात्रे, चंद्रहास पाटील, भालचंद्र पाटील, निलेश ठाकूर, माजी सरपंच योजना ठाकूर, माजी उपसरपंच जगन्नाथ म्हात्रे, शलाका पाटील, विनोद पाटील, राजकुमार पाटील, सुनील पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर आणि मंडळाचे सदस्य व विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा व खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन विकास पाटील यांनी केले.

## क्रीडा आराखडा व्यापक करण्यावर अर्थसंकल्पात भर

**मुंबई** : भारताचे २०२६च्या ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद मिळवण्याचे स्वप्न आणि त्यामध्ये महाराष्ट्रातील खेळाडूंचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. मिशन लक्षवेध अंतर्गत राज्याचा क्रीडा आराखडा अधिक व्यापक करण्यावर या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. अ‍ॅथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, धनुर्विद्या, शूटिंग, रोइंग, सेलिंग, लॉन टेनिस आणि टेबल टेनिस या १२ महत्त्वाच्या खेळांसाठी राज्यस्तरावर ८ 'हाय परफॉर्मन्स सेंटर' आधीच कार्यान्वित करण्यात आले आहेत. अशाच प्रकारचे आणखी चार नवीन केंद्र लवकरच सुरू करण्यात येणार आहेत.

# पाच चेंडूत पाच विकेट्स!

## 'किवी' गोलंदाजाचा प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये विश्वविक्रम

**मॅकलीन पार्क : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज ब्रेट रँडेल याने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सलग पाच चेंडूंत पाच गडी बाद करून एक नवा जागतिक इतिहास रचला आहे. असा पराक्रम गेल्या २५४ वर्षांत कोणालाही जमला नव्हता.

प्लंकेट शील्ड स्पर्धेत सेंट्रल डिस्ट्रिक्ट्स विरुद्ध नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्स या संघांमध्ये मॅकलीन पार्क येथे हा सामना खेळला गेला. नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्सच्या डावाच्या सुरुवातीलाच रँडेलने आपल्या गोलंदाजीने प्रतिस्पर्धी फलंदाजांच्या चिंधड्या उडवल्या. रँडेलने आपल्या दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर हेन्री कूपरला बाद केले. त्यानंतर पुढच्या षटकातील पहिल्या चार चेंडूवर त्याने सलग चार बळी घेतले. यात न्यूझीलंडचा माजी कसोटी सलामीवीर जीत रावल याचाही समावेश होता. पाचव्या चेंडूवर ख्रिस्तियन क्लार्कला बाद करताच रँडेलने हा



'महाविक्रम' आपल्या नावावर केला.

आयर्लंडच्या कर्टिस कॅम्फरने टी-२०मध्ये असा पराक्रम केला असला, तरी प्रथम श्रेणी क्रिकेटच्या प्रदीर्घ इतिहासात ही पहिलीच वेळ आहे.

# प्रिआ प्रीमियर लीगमध्ये व्हॅनबरी कंपनी विजेती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या प्रिआ प्रीमियर लीग २०२६' या औद्योगिक क्रिकेट स्पर्धेचा नुकताच दिमाखदार सोहळ्यात समारोप झाला. मोहोपाडा येथील नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सच्या (एनआयएसएम) भव्य आणि सुसज्ज स्टेडियमवर स्पर्धा रंगली.




औद्योगिक वसाहतीमधील सदस्य उद्योगांमध्ये परस्पर स्नेह आणि सहकार्य वाढावे तसेच दैनंदिन कामाच्या व्यापातून कर्मचाऱ्यांना थोडा विरंगुळा आणि आनंद मिळावा या उद्देशाने असोसिएशनने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या उपक्रमाला परिसरातील उद्योगांनी भरघोस प्रतिसाद दिला आणि एकूण २४ संघांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

स्पर्धेचा अंतिम सामना अत्यंत अटीतटीचा झाला. ही अंतिम लढत व्हॅनबरी लि. आणि प्रसोल केमिकल्स प्रा. लि. यांच्यात रंगली. या रोमांचक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत व्हॅनबरी लि. संघाने विजेतेपद पटकावले. प्रसोल केमिकल्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर बकुळ अ‍ॅरोटिक्स कंपनीचा संघ तृतीय स्थानी राहिला.

बक्षीस वितरण समारंभ रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. विजेत्या संघांना आणि उत्कृष्ट खेळाडूंना गौरविण्यात आले.

# नाशिक महिला क्रिकेट प्रीमियर लीग रंगणार

**नाशिक : प्रतिनिधी**

देशभरात महिला क्रिकेटची वाढती लोकप्रियता लक्षात घेत नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने महिलादिनी नाशिक जिल्ह्यातील सर्व महिला क्रिकेटपटूंना आनंदाची बातमी देण्यात आली आहे. नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या (एनडीसीए) वतीने नाशिक महिला क्रिकेट प्रीमियर लीग (एनडब्ल्यूपीएल)ची घोषणा करण्यात आली आहे.

नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष विनोद शहा यांनी ही घोषणा केली. नाशिकमधील महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी, नाशिकमधूनही स्मृती मानधना, हरमनप्रीत कौर, मिताली राज यासारख्या क्रिकेट खेळाडू घडविण्यासाठी, युवा खेळाडूंना व्यावसायिक स्तरावर खेळण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी एनडब्ल्यूपीएल आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नाशिकमधील महिला क्रिकेटच्या विकासासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

सध्या नाशिक जिल्ह्यात सुमारे १५० महिला क्रिकेटपटू सक्रियपणे क्रिकेट खेळत आहेत. या खेळाडूंना स्पर्धात्मक अनुभव, व्यावसायिक वातावरण आणि मोठ्या स्तरावर खेळण्याची संधी मिळावी या उद्देशाने एनडब्ल्यूपीएल आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आयोजित करण्यात येणार असून स्पर्धेत पाच फ्रँचायझी संघ सहभागी होतील. स्पर्धा लीग पद्धतीने खेळविण्यात येणार असून त्यानंतर उपांत्य फेरी व अंतिम सामना होईल.

# ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने अ‍ॅड. पूजा राजा ठाकूर यांच्या सहकार्याने ७२व्या पुरुष व महिला जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कळवा, खारेगाव, ठाणे (प.) येथील खारलँड मैदान, सह्याद्री हायस्कुलच्या समोरील मैदानावर ९ ते १७ मार्च या कालावधीत सायंकाळी ५ ते ११ या कालावधीत हे सामने होतील. यंदा राज्य संघटनेने पुन्हा एक जिल्हा एक संघ ही संकल्पना राबविल्याने पुरुष संघाचा सहभाग मोठ्या प्रमाणात झाला आहे.

ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष व ठाणे महापालिकेचे उपमहापौर कृष्णा पाटील आणि संघटनेचे कार्याध्यक्ष भरत पाटील यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन होईल. स्पर्धेची भाग्य पत्रिका सर्व संबंधित संघाना हस्ते परहस्ते पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या संघाना ती अद्याप मिळाली नसेल त्यांनी जिल्हा संघटनेच्या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन सचिव मालोजी भोसले यांनी केले आहे.

# सायली सतघरेचा बॉल ऑफ द सेंच्युरी

**पर्थ : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ऐतिहासिक डे-नाईट कसोटी सामन्याचा थरार सुरू आहे. पर्थच्या वाका मैदानावर भारतीय संघाला पहिल्या दिवशी फलंदाजी करताना मोठी धावसंख्या उभारता आली नाही, पण गोलंदाजी करताना भारतीय गोलंदाजांची जादू पहायला मिळाली. भारतीय संघाकडून आपला पहिलाच सामना खेळत असलेल्या सायली सतघरे दमदार गोलंदाजी केली आणि आपल्या कसोटी कारकिर्दीतील



पहिली विकेट घेतला.

सायली सतघरेने अचूक लाईन लेंथवर गोलंदाजी करून ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना अडचणीत टाकले. जॉर्जिया वोलला बाद करत तिने आपल्या क्रिकेट कारकिर्दीतील पहिली विकेट घेतली. झाले असे की, भारतीय संघाची गोलंदाजी सुरू असताना तिसरे षटक टाकण्यासाठी सायली गोलंदाजीला आली. या षटकातील दुसरा चेंडू तिने ऑफ स्टंपच्या बाहेर टाकला. हा चेंडू टप्पा पडताच स्विंग होऊन आत आला आणि लेग स्टंप उडवून गेला. त्यामुळे जॉर्जिया वोलचा डाव अवघ्या दोन धावांवर आटोपला. या भन्नाट चेंडूचा व्हिडिओ सोशल मीडियावर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

# आधी नृत्य, मग रन-आऊट!

## स्थानिक क्रिकेट सामन्यातील प्रकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतातील एका स्थानिक कनिष्ठ गटाच्या क्रिकेट सामन्यादरम्यान एक अत्यंत मजेशीर घटना घडली. फलंदाजाला धावबाद करण्यापूर्वी काही तरुण क्रिकेटपटूंनी मैदानातच 'भांगडा' केल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडीओने नेटकऱ्यांचे चांगलेच मनोरंजन केले असून त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.



हा प्रकार दोन किशोरवयीन संघांमधील सामन्यात घडला. व्हायरल व्हिडीओमध्ये दिसते की, स्ट्रायकर फलंदाज चेंडू फटकावल्यानंतर धाव घेण्यासाठी सरसावतो. ही धाव पूर्ण होते. त्याच वेळी क्षेत्ररक्षकाने बॉलिंग एन्डला फेकलेला चेंडू दूर जातो. त्याच वेळी दुसरी धाव घेण्यासाठी दोन्ही फलंदाजांमध्ये कॉल होतो. दोघेही पळायला लागतात, पण नॉन स्ट्रारकर एन्डला असणारा फलंदाज अचानक माघारी परततो आणि त्याचवेळी स्ट्रायकर एन्डचा फलंदाजही नॉन स्ट्रायकर एन्डला येतो. या गोंधळानंतर दोन्हीपैकी एकानेही दुसऱ्या टोकाकडे धाव घेण्याचा प्रयत्न करत नाही. दोन्ही फलंदाज खेळपट्टीच्या एकाच टोकाला येऊन उभे राहतात. दरम्यान, क्षेत्ररक्षक यष्टीरक्षकाकडे चेंडू फेकतो.

दोन्ही फलंदाज एकाच एन्डला उभे असल्याचे पाहून यष्टीरक्षक आणि इतर क्षेत्ररक्षक यष्टचा उडवण्यापूर्वी आनंदाच्या भरात 'भांगडा' करायला सुरुवात करतात. हा डान्स पूर्ण झाल्यानंतर यष्टीरक्षक शांतपणे यष्ट्या उडवून फलंदाजाला धावबाद करतो. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडीओला आतापर्यंत लाखो व्ह्यूज मिळाले आहेत.

काही नेटकऱ्यांनी मात्र या अतिउत्साही सेलिब्रेशनवर टीका केली आहे. एका युजरने बांगलादेशी क्रिकेटपटू तौहीद रणाचे उदाहरण देत म्हटले की, बाद झाल्यावर फलंदाजाला वाईट वाटते, मग जल्लोष कशासाठी?, तर अन्य एकाने लिहिले की, विकेट मिळाल्यावर आनंद साजरा करणे हा क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाचा हक्क आहे, पण अशा प्रकारचे सेलिब्रेशन खेळ भावनेला धरून नाही.

# लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी मैदानात उतरला अर्जुन तेंडुलकर

**मुंबई : प्रतिनिधी**

दिग्गज क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याने ५ मार्चला सानिया चांडोकच्या साथीने आपल्या आयुष्यातील नव्या इनिंगची सुरुवात केली. प्री वेडिंगआधी क्रिकेटच्या मैदानात उतरुन मॅन ऑफ द मॅचचा मानकरी ठरलेला अर्जुन लग्नानंतर दुसऱ्या दिवशीच मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले.



अर्जुन तेंडुलकर हा डी.वाय. पाटील टी-२० कप २०२६ स्पर्धेत डी.वाय. पाटील ब्लू टीम या संघाकडून खेळताना पहायला मिळाले. वैभव सूर्यवंशीदेखील या संघाचा भाग आहे. सेमीफायनलमध्ये वैभव आणि अर्जुन यांच्या संघाचा सामना मुंबई कस्टम्स संघाविरुद्ध रंगल्याचे पहायला मिळाले. या सामन्यात अर्जुनने एका षटकात २० धावा खर्च केल्या. फलंदाजीतही तो नऊ धावांवर बाद झाला. तो विशेष कामगिरी करू शकला नसला तरी त्याच्या खिलाडूवृत्तीचे कौतुक होत आहे. वैभवला खातेही उघडता आले नाही.

### आयपीएलमध्ये लखनऊकडून खेळणार

यंदाच्या आयपीएल स्पर्धेत अर्जुन तेंडुलकर हा लखनऊ सुपर जाएंट्स संघाचा भाग असेल. मिनी लिलावाआधी ट्रेडच्या माध्यमातून तो मुंबई इंडियन्सच्या संघातून लखनऊ संघात गेला आहे. आयपीएलमध्ये बराच काळ मुंबईच्या ताफ्यात राहूनही त्याला फक्त पाच सामन्यातच संधी मिळाली. यात त्याने तीन विकेट्स घेतल्या आहेत. यंदाच्या हंगामात त्याला नव्या संघाकडून अधिकाधिक संधी मिळणार का? तो आपली छाप सोडण्यात यशस्वी ठरणार का? ते पाहण्याजोगे असेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com